रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८८ । अंक १२२ । पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल
रायगड, सोमवार, दि. ३० सप्टेंबर २०२४
किंमत ४ ₹

## नेरळमध्ये डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ

**नेरळ :** नेरळ गावातील एका वकिलीचे शिक्षण पूर्ण करणाऱ्या तरुणाचा बळी गेल्यानंतरदेखील नेरळ ग्रामपंचायत प्रशासन ठिकाणावर आले नाही. नेरळ गावातील आणखी चार डेंग्यूचे रुग्ण वेगवेगळ्या रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यामुळे नेरळ गावातील डेंग्यूचे डासांची साखळी तोडण्याचे काम नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून सुरू आहे.नेरळ गावातील जुनी बाजारपेठ भागातील तरुणाचा डेंग्यू झाल्याने मृत्यू झाला होता. हा वकिलीचे शिक्षण पूर्ण केलेला तरुण नोकरीचे ठिकाणी नेरळ-मुंबई असा प्रवास करायचा. त्याला डेंग्यू झाल्याने नेरळ जुनी बाजारपेठमध्ये नेरळ प्राथमिक पान २ वर





# वीज तोडली, शिक्षण अडलं

प्रमोद जाधव
। अलिबाग ।

**अलिबाग तालुक्यातील ५४ शाळांचे सुमारे दोन लाख ७५ हजार रुपयांचे वीज बिल थकले आहे. महावितरणने कारवाईचा बडगा उगारत पाच शाळांचे वीज कनेक्शन तोडले आहे. सध्या या शाळा अंधारात असून, अन्य ४९ शाळांना शॉक देण्याची तयारी महावितरणने केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे भविष्य अंधारात राहण्याची भीती निर्माण झाली आहे. याकडे जिल्हा परिषद, शिक्षण विभाग गांभीर्याने लक्ष देईल का, हा खरा प्रश्न आहे. मागील काही महिन्यांपूर्वीदेखील वीज बिल न भरल्याने शाळा अंधारात राहिल्याच्या घटना घडल्या होत्या. आता पुन्हा एकदा ग्रामपंचायतींच्या बेफिकरीमुळे शाळांसह विद्यार्थ्यांना मनस्ताप सहन करावा लागणार असल्याचे चित्र आहे.**

अलिबाग तालुक्यात जिल्हा परिषदेच्या १६९ शाळा असून, या शाळांमध्ये सुमारे सहा हजारांहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या शाळांपैकी तालुक्यातील ५४ शाळांमधील वीज बिल गेल्या काही महिन्यांपासून थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. ९७० रुपयांपासून १७ हजार रुपयांपर्यंत बिल शाळांनी भरले नसल्याची माहिती आकडेवारीनुसार स्पष्ट झाली आहे. या ५४ पान २ वर

- **४९ शाळांना शॉक देण्याची महावितरणची तयारी**
- **ग्रामपंचायतींच्या बेफिकरीचा विद्यार्थ्यांना फटका**



### डिजिटल शिक्षणासाठी मोबाईलचा आधार

कुदे येथील जिल्हा परिषद शाळेतील वीज मीटर फॉल्टी असल्याने बिल भरमसाठ आले. त्यामुळे १७ हजारांहून अधिक बिल थकीत असल्याचे सांगण्यात आले आहे. वीज बिल न भरल्याने शाळा अंधारात असून, विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण मोबाईलद्वारे दिले जात आहे. शासनाकडून अनुदान कमी येत असल्याने भौतिक सुविधांसह वीज बिल भरणे परवडत नाही. त्यामुळे वीज बिल भरण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची असून, याबाबत ग्रामपंचायतीला शाळेने पत्र दिले आहे, अशी माहिती शाळेकडून देण्यात आली आहे.

> मीटर फॉल्टी असल्याने वीज बिल भरमसाठ आले. मीटर काढून नेण्यात आले आहे. बिल थकीत असल्याचे पत्र शिक्षण विभागाला व ग्रामपंचायतीला दिले आहे.
> – रुपाली माळी, मुख्याध्यापिका, कुदे जिल्हा परिषद शाळा

> १५ वित्त आयोगातून शाळेतील बिलाचे नियोजन केले जात आहे. कुदे शाळेतील बिल कार्यालयात आले नाही. बिल मागील अनेक महिन्यांपासून थकीत आहे. त्याची पाहणी करून आराखड्यानुसार बिल भरण्याची तयारी केली जाईल.
> – दर्शन धुमाळ, ग्रामसेवक, सुडकोली ग्रामपंचायत

## नेपाळमध्ये पावसाचे थैमान



। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।

नेपाळमध्ये मुसळधार पावसाने थैमान घातले आहे. भूस्खलन आणि पुरामध्ये नेपाळमध्ये कमीत कमी ११२ जणांचा मृत्यू झाला आहे. अनेक जण बेपत्ता आहेत. त्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे. नेपाळमध्ये गुरुवारपासून पाऊस धुमाकूळ घालत आहे. अनेक भागात जोरदार पाऊस बरसत आहे. आतापर्यंत ३००० लोकांना वाचवण्यात यश आलं आहे. अनेक शहरांमध्ये पाणी साचलं आहे. सध्या देशातील ६३ ठिकाणचे राष्ट्रीय महामार्ग ब्लॉक झाले आहेत. नेपाळमध्ये अनेक भागात विजेचा पुरवठा खंडित झाला आहे.

दरम्यान, काटमांडूमधील २२६ गावे पाण्याखाली गेले आहेत. मुसळधार पावसामुळे नेपाळमधील सर्व शाळा तीन दिवस बंद ठेवण्याचे आणि नियोजित परीक्षा पुढे ढकलण्याचे निर्देश सरकारने दिले आहेत. नेपाळमधील मुसळधार पावसामुळे बिहार सरकारने राज्याच्या उत्तर भागात पुराचा धोका जाहीर केला आहे. नेपाळमधील पावसामुळे बिहारमध्ये वाहत येणाऱ्या गंडक, कोसी, महानंदा आणि इतर नद्यांचा प्रवाह वाढला आहे. याचा फटका बिहारमधील १३ जिल्ह्यांना बसला असून, यामुळे १,४१,००० लोक प्रभावित झाले आहेत. पश्चिम चंपारन, पूर्व चंपारन, शिवहर, गोपालगंज, शिवन, सितामर्ही, अरारिया, क्रिष्णकुंज, पुर्णिया, सुपौल, मधेपुरा, मुजफ्फरपुर आणि मधुबनी या जिल्ह्यांना सर्वाधिक फटका बसला आहे. प्रशासनाने मदतकार्य सुरु केले आहे.

## ...तर तुमचा राजकीय एन्काऊंटर होईल

### जरांगेंचा अमित शाह यांना इशारा

। जालना । प्रतिनिधी ।

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा महाराष्ट्र दौऱ्यावर असताना त्यांनी मराठा आंदोलनाला हिणवले होते. अशी अनेक आंदोलने आम्ही हाताळली आहेत, असे वक्तव्यही त्यांनी केले होते. यावर मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी, मराठ्यांच्या नादी लागू नका, नाही तर तुमचा राजकीय एन्काऊंटर करु, असा थेट इशारा अमित शाह यांना दिला आहे. तसेच तुम्ही मराठ्यांना आरक्षण दिले तर सत्ता मिळवण्यापासून तुम्हाला कोणीही रोखू शकत नाही. मराठ्यांच्या पाठिंब्याशिवाय कोणतेही सरकार स्थापन होणे शक्य नसल्याचेही जरांगे यांनी स्पष्ट केले.



मराठा आरक्षणाबाबत आपण जाहीरपण सांगतो की, अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांना मराठ्यांना आरक्षण द्यावेच लागणार आहे. धनगरचा जीआर सरकार काढणार असेल तर मराठा आणि कुणबीदेखील एकच आहे, हा जीआर निघायला सरकारची काहीच हरकत नसावी. सरकार दुजाभाव करू शकत नाही. याबाबतचा पान २ वर

## शेतकऱ्यांची मेहनत मातीमोल

। पाली/बेणसे । प्रतिनिधी ।

रायगड जिल्ह्यातील सुधागड तालुक्यातील आपटवणे येथील शेकडो शेतकरी संकटात सापडलेत. अस्मानी संकटाचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांना आता बियाण्यात झालेल्या फसवणुकीने रडकुंडीला आणले आहे. बोगस बियाण्यांमुळे शेतकऱ्यांची वर्षभराची मेहनत मातीमोल झाली असून, त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. हातातोंडाशी आलेला घास गळून पडल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. याबाबत तात्काळ पंचनामे करुन शासनाने नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी करण्यात येत आहे.

याबाबतची हकीकत अशी की, येथील शेतकऱ्यांनी पाली येथील कृषी सेवा केंद्रामधून पान २ वर

- **बोगस बियाण्यांमुळे भातपीक वाया**
- **शेकडो शेतकऱ्यांवर उपासमारीचे वेळ**

### मोठे आर्थिक नुकसान

आम्हा सर्व शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह केवळ शेतीवर आहे, आम्ही वर्षभर जे काही तुटपुंजी साठवतो, तीच शेती लागवडीत टाकतो. मात्र, आता बियाण्यात फसवणूक झाल्याने पीक हातचे गेले असून, खर्चही वाया जाणार आहे. आमच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे. शासनाने आम्हाला तात्काळ नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी वैशाली केदारी यांच्यासह अन्य शेतकऱ्यांनी केली आहे.



● (छायाचित्र : धम्मशील सावंत)

## महायुतीकडे खोक्यांचा चेहरा

### नाना पटोलेंचा जोरदार हल्लाबोल

। मुंबई । प्रतिनिधी ।

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही महाविकास आघाडी म्हणून एकत्र सामोरे जाणार आहोत. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रासाठी काही मोठा विषय नाही. महायुतीकडे चेहरा आहे का? हा केवळ खोक्यांचा चेहरा असल्याची सडकून टीका काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. यावेळी त्यांनी शिंदे फडणवीस सरकारवर कडाडून हल्लाबोल केला.

दरम्यान, बदलापूर घटनेवर नाना पटोले यांनी भाष्य केले. पटोले म्हणाले की,या सरकारची आता कीव येऊ लागली आहे. याचं राजकारण करायचं नाही याचं भान आम्हाला आहे. सत्तेतील लोक मात्र राजकारण करत आहेत. गुन्हेगार शिंदे, खासदार शिंदे, मारणारा शिंदे, मुख्यमंत्री शिंदे या सगळ्या प्रकरणांमध्ये शिंदे दोषी कसे, अशी खोचक विचारणा नाना पटोले यांनी केली. ते पुढे म्हणाले की महाराष्ट्रामध्ये विविध घटना घडल्या आहेत. देवेंद्र फडणीसांच्या राज्यातही घटना घडल्या आहेत. यांना साधी लाजदेखील वाटत नाही. यावर ते राजकारण करत आहेत. एन्काऊंटर झाला की आत्महत्या झाली याबाबत प्रकरण न्यायालयात आहे. खऱ्या आरोपीला मदत करण्यासाठी माझ्या मुलाला मारले गेल्याचा आरोप आई-वडिलांनी केला असल्याचे नाना पटोले म्हणाले. ही घटना एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस लपवत आहेत. जे दोषी आहेत, त्या सगळ्यांचे एन्काऊंटर करा, अशी मागणी पटोले यांनी केली.

## पर्यटकांनी किनारे गजबजले...



सुधीर नाझरे
। मुरुड ।

पावसाने परतीची वर्दी देताच पर्यटक हळूहळू घराबाहेर पडू लागले आहेत. त्यामुळे मागील काही दिवसांपासून पर्यटकांविना सुने सुने पडलेले समुद्रकिनारे पुन्हा एकदा गजबजल्याचे दिसून आले. शनिवार, रविवार सलग दोन दिवसांची सुट्टी एन्जॉय करण्यासाठी राज्यभरातून पर्यटक मुरुडमध्ये दाखल झाले होते. त्यामुळे येथील किनाऱ्यावर पर्यटकांची मांदियाळी पाहावयास मिळाली.

यावेळी पर्यटकांनी घोडागाडी सवारी, वॉटर्स राईड्सचा आनंद घेत येथील ताज्या मासळीवर ताव मारला. पर्यटकांच्या येण्याने कॉटेजेस, हॉटेल्स मालकांमध्ये आनंदाचे वातावरण होते. आगामी नवरात्रौत्सव, दसरा, दिवाळीसारख्या सणांमध्ये येथील पर्यटन हंगाम बहरणार असल्यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## शेतकऱ्यांचा राडा

। मुंबई । प्रतिनिधी ।

राज्याच्या कृषी पुरस्कार सोहळ्यात राडा झाल्याचा प्रकार समोर आला आहे. राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम नियोजित होता. मात्र, या कार्यक्रमाला उशीर झाल्याने तसेच राज्यपालांकडून अत्यंत कमी वेळ देण्यात आल्याने नाराज शेतकऱ्यांनी गोंधळ करण्यासा सुरूवात केली. यावेळी राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी शेतकऱ्यांची समजूत काढली. यावेळी नाराज शेतकऱ्यांनी मात्र गोंधळ घातल्याचे पाहायला मिळाले.

हा कार्यक्रम वरळीतील नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया (डोम) येथे पार पडला. दरम्यान, कार्यक्रमाला उशीर झाल्याने राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते काही पान २ वर

## ई-रिक्षाचालकाची मनमानी

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरात सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने पर्यावरणपूरक ई-रिक्षांचा पायलट प्रकल्प चालविला जात आहे. या प्रकल्पातील कन्हैया खेर या ई-रिक्षाचालकाने एका वृद्ध आणि आजारी नागरिकाला प्रवासी वाहतूक देताना ३५ रुपये प्रवासी भाडे आकारण्याऐवजी १५० रुपये भाडे आकारल्याची तक्रार समाज माध्यमांकडून समोर आली होती. दरम्यान, त्या तक्रारीवरून कन्हैया खेर यास ४८ तासांच्या आत खुलासा करण्याचे आदेश माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेकडून दिले आहेत.



- **प्रवाशाकडून जास्तीचे भाडे आकारणी**
- **पालिकेकडून कारणे दाखवा नोटीस**

माथेरानमध्ये सद्यःस्थितीत २० ई-रिक्षांना प्रयोगिक पान २ वर







### चायनीज पदार्थातील अजिनोमोटो शरीराला घातक

## जिभेचे चोचले नको, पोटासाठी खा!


। रायगड । खास प्रतिनिधी ।

आताच्या फास्ट लाईफ स्टाईलच्या जमान्यात हे हेल्दीफूड खाण्याऐवजी फास्टफूड खाण्यालाच पसंती दिली जात आहे. चमचमीत, मसालेदार पदार्थ खाल्ल्याने, विशेष करुन चायनीज पदार्थ खाल्ल्याने ते घातक ठरु शकते. चायनीच पदार्थांमध्ये असणारा अजिनोमोटो अतिशय घातक ठरतो. त्यामुळे जिभेचे चोचले पुरवण्यापेक्षा पोटासाठी खाल्ले तर, ते शरीरसाठी नक्कीच फायदेशीर ठरते. मात्र, संबंधित यंत्रणांनी याबाबत कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

आजकाल आपली जीवनशैली बदलली आहे. प्रत्येकाचेच आयुष्य हे धावपळीचे झाले आहे. त्यामुळे खाण्या-पिण्याच्या वेळा चुकत आहेत. पान २ वर

### अजिनोमोटो म्हणजे काय?

अजिनोमोटोला 'मोनो सोडिअम ग्लुटामेट' या व्यावहारिक नावाने ओळखले जाते. अजिनोमोटोचा वापर हा जास्त करून चायनीज खाद्यपदार्थ तयार करताना केला जातो. अजिनोमोटा हा मसाला नाही, तर हा एक स्वाद आहे. आंबट, गोड, तिखट, खारट तसाच हा एक पाचवा स्वाद आहे. जो थोडा तुरट वेगळ्याच चवीचा आहे. अजिनोमोटो पदार्थाचा स्वाद वाढवण्याबरोबरच पदार्थाचे आयुष्य टिकवण्याचे काम करतो.



### चायनीज आरोग्यास घातक ठरु शकते

अजिनोमोटोच्या अतिसेवनाने आपल्या शरीराला विविध विकार जडण्याची शक्यता असते. हा पदार्थ किती प्रमाणात खावा याबाबत मानक ठरलेले आहे. परंतु, सातत्याने अजिनोमोटोच्या सेवनाने पोटाचे विकार वाढतात. डिप्रेशन, उच्च रक्तदाब, मधुमेह, एकाग्रता भंग होणे, असे आजार बळावण्याची अधिक शक्यता असते. त्यामुळे ते खाणे टाळावे, असा सल्ला तज्ज्ञ डॉक्टर देतात.

## पान १ वरून

## वीज तोडली, शिक्षण अडलं

शाळांमध्ये सुमारे एक हजारहून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. वीज बिल थकीत असल्याने महावितरण विभागाने कारवाई करण्यासदेखील सुरुवात केली आहे. त्यामध्ये तालुक्यातील नागझरी, भोमोली, डांगी, कुदे, सागरगड येथील शाळांचे वीज कनेक्शन तोडले आहे. त्यामुळे या शाळा अंधारात असून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. शाळांमध्ये पुरेसे प्रकाश नसल्याने विद्यार्थ्यांना शिकविताना शिक्षकांना अडचण येत आहे. जिल्हा परिषद शाळांच्या किरकोळ खर्चासाठी संयुक्त शाळा अनुदान शासनाकडून वर्ग केला जातो. शाळेतील पटसंख्येनुसार हा निधी वर्ग केला जातो. त्यामध्ये ३० पटसंख्या असलेल्या शाळांना दहा हजार रुपये ६० पर्यंत पटसंख्या असलेल्या शाळांना २५ हजार रुपये, त्यापेक्षा अधिक असलेल्या शाळांना ५० हजार व ७५ हजार व एक लाख रुपये असे अनुदान जिल्हा परिषद शिक्षण विभागाकडून वर्ग केले जाते. परंतु, हे अनुदानच शाळांपर्यंत पोहोचले नसल्याची माहिती समोर येत आहे. शाळांचे अनुदान वेळेवर मिळत नसल्याचा फटका शाळांना बसत आहे. जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाच्या या कारभारामुळे अनेक शाळा अंधारात राहण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जिल्हा परिषद शाळांना निधी पुरेसा मिळत नसल्याने ग्रामपंचायतींनी त्यांच्या उत्पन्नातून खर्च करून शाळांचे बिल भरण्याचे पत्र मागील काही वर्षांपूर्वी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले होते. काही ग्रामपंचायती त्याची अंमलबजावणी करीत आहेत. परंतु, काही ग्रामपंचायती निधी नसल्याचे कारण सांगून बिल भरण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप शाळेतील मुख्याध्यापकांकडून केला जात आहे.

## ..तर तुमचा राजकीय एन्काऊंटर होईल

अध्यादेश निवडणुकीआधीच काढावा लागणार आहे. मराठ्यांच्या पाठिंब्याशिवाय कोणीही सत्ता स्थापन करू शकत नाही, असेही जरांगे म्हणाले. आरक्षण हा राजकीय आणि वादाचा मुद्दा नाही. ही समस्या सोडवण्यासाठी सामंजस्य आणि मनाचा मोठेपणा लागतो. माणुसकीचा विचार मनात असला पाहिजे, असेही जरांगे म्हणाले. जरांगे पुढे म्हणाले की, अमित शाह शिर्डीला आले होते, तेव्हा आम्ही त्यांना म्हटलं होतं की, मराठा आरक्षणावर बोला. पण, ते काहीही बोलले नाही. पण साहेब तुम्ही मराठ्यांच्या नादी लागू नका. आम्ही तुम्हाला सांगतो, तुम्ही पटेल आंदोलन कसं हाताळलं? तुम्ही गुर्जर आंदोलन कसं हाताळलं? तसंच मराठ्यांचं आंदोलन हाताळणार का? आम्ही देवेंद्र फडणवीस आणि अमित शाहांना सांगतो की, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्यावंच लागणार आहे. निवडणुकीच्या आधी अध्यादेश काढावा लागणार आहे. तुमची आंदोलन हाताळण्याची पद्धत मला चांगली माहिती आहे. जर तुम्हाला वाटत असेल मराठ्यांना बाजूला ठेवून हे आंदोलन हाताळू, तर अमित शाहांची ही घोडचूक असेल, असा इशारासह जरांगे यांनी दिला.

## जिभेचे चोचले नको, पोटासाठी खा!

वेळी-अवेळी खाण्यामुळे विविध आजारांना निमंत्रण देण्यात येते. घरचे जेवण खाण्यापेक्षा हॉटेलमधील चमचमीत पदार्थांवर चांगलाच ताव मारला जातो. फास्टफूड खाण्याला पसंती दिली जात आहे. त्यामध्ये जास्त करुन चायनीज पदार्थ खाण्याकडे अधिक कल असल्याचे दिसून येते. याच कारणांनी प्रत्येक चायनीज फूडच्या स्टॉलवर अथवा रेस्टॉरंटमध्ये खवय्यांची चांगलीच गर्दी दिसून येते. परंतु, चायनीज पदार्थ तयार करताना अजिनोमोटो हा घटक वापरण्यात येतो. त्याचे सातत्याने सेवन हे शरीरासाठी अतिशय घातक ठरते.

स्वाद वाढवण्यासाठी आणि पदार्थाचे आयुष्य टिकवण्यासाठी अजिनोमोटोचा वापर मोठ्या प्रमाणात करण्यात येतो. अजिनोमोटो किती प्रमाणात खाल्ले पाहिजे, याबाबत काही मानत ठरलेले आहेत. त्याचे उल्लंघन झाल्यास मानवी शरीरास फारच अपायकारक ठरण्याचा धोका अधिक असतो. त्यामुळे असे पदार्थ खाणे टाळावे. वेळेवर सकस आहार घ्यावा.

## शेतकऱ्यांची मेहनत मातीमोल

जया भात बियाणे खरेदी केले. मात्र, ९० टक्क्यांपेक्षा जास्त बियाणे खेड, काळी कचरी, भेळ असल्यामुळे या पिकाला भाव मिळणार नाही. मोठ्या कष्टाने आणि खर्चाने केलेली लागवड मोठ्या नुकसानीत गेली. हाता तोंडाशी आलेला घास गळून पडल्याने शेतकरी हवालदिल झालाय. शेतकऱ्यांवर आता उपासमारीची वेळ येणार आहे. तालुका कृषी अधिकारी, पंचायत समिती कृषी अधिकारी यांनी तातडीने पंचनामे करून शासनाने नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केलीय. तर, कृषी सेवा केंद्राची चौकशी करून योग्य ती कारवाई करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. सुधागड कृषी मित्र संघटनेचे पदाधिकारी शरद गोळे म्हणाले, दरवर्षी शेतकरी वेगवेगळ्या कृषी सेवा केंद्रातून भात बियाणे घेतो, २०२४ च्या मोसमात येथील शेतकऱ्यांनी जे बियाणे घेतले, ते बियाणे लागवडीच्या तीन महिन्यांनंतर पीक लोंबीवर आलं. मात्र, या शेतीत ९९ टक्के पिकावर खेड आली आहे, त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. सर्व शेतकऱ्यांवर अस्मानी संकट ओढावले असून, आता ओला दुष्काळदेखील आला आहे. यातच पिकांचे मोठे नुकसान झाले आहे, शासनाने जलद पंचनामे करून नुकसानभरपाई मिळवून द्यावी अन्यथा येत्या काळात उग्र आंदोलन करू, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी शरद गोळे, शेतकरी विलास दंत, वसंत दंत, भरत दंत, राजाराम दंत, कृष्णा दंत, राम भोईर, हरिश्चंद्र भोईर, महादेव चोरगे, राम महाडिक, चिंतामण दंत, तुकाराम दंत, दयाराम दंत, राजाराम दंत, लक्ष्मण भोईर,ज्ञानेश्वर जाधव, पांडुरंग दंत, लक्ष्मण महाडीक, गणेश भोईर, पांडुरंग दंत, संतोष दंत, आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ई-रिक्षाचालकाची मनमानी

तत्त्वावर रिक्षा चालवण्यास परवानगी देण्यात आली आहे. दरम्यान, क्रमांकएकची हातरिक्षा असलेले हातरिक्षा चालक कन्हैया खेर यांनी आपल्या ई रिक्षामधून माथेरान हुतात्मा चौक ते दस्तुरी स्टॅन्डपर्यंत एका ज्येष्ठ आणि आजारी व्यक्तीला प्रवासी वाहतूक करून नेले. मात्र, त्यांच्याकडून ३५ रुपये माणसी भाडे आकारण्याऐवजी तब्बल १५० रुपये भाडे आकारले. त्याबाबत स्थानिक युट्यूब वाहिनीवरून संबंधित विषयाचे वृत्त प्रसिद्ध करण्यात आले. त्यानंतर माथेरान नगरपरिषदेने समाज माध्यमावर व्हायरल झालेल्या वृत्ताची दखल घेऊन खात्री केली आणि नंतर ई रिक्षा चालक कन्हैया खेर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. याबाबतचा लेखी खुलासाही नोटीस मिळाल्यापासून ४८ तासांच्या आत देण्याचे आदेश दिले आहेत. आपला खुलासा अपात्र असल्यास किंवा असमाधानकारक असल्यास आपल्याविरुध्द कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची गंभीर नोंद घेण्यात यावी, असे पत्र माथेरान पालिकेचे वतीने मुख्याधिकारी राहुल इंगळे यांनी दिले आहे.

## नेरळमध्ये डेंग्यूच्या रुग्णांमध्ये वाढ

आरोग्य केंद्राचे किमान दोन हजार रहिवाशांची भेट घेऊन आरोग्य तपासणी केली होती. त्यावेळी त्या तरुणाचे आईवडील किंवा अन्य एकही रुग्ण आढळून आला नव्हता. मात्र, त्यानंतर १५ दिवसांनी नेरळ गावातील जुनी बाजारपेठ, बोंबील आळी तसेच लोकमान्य टिळक चौक आणि सम्राटनगर अशा चार डेंग्यू झालेल्या रुग्णांवर उपचार सुरू आहेत. दरम्यान, नेरळ गावातील डेंग्यूचे डासांची उत्पत्ती रोखण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्राने उपाययोजना सुरू केल्या आहेत. त्यात जुनी बाजारपेठ आणि बोंबील आळी परिसरातील पाणी साठवून ठेवलेल्या सर्व टाक्यांमध्ये तसेच इमारतीचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पाणी साठवून ठेवलेल्या ठिकाणी डासांच्या अळी यांना रोखण्यासाठी अळीनाशकांची फवारणी केली जात आहे. पाणी साठवून ठेवलेल्या प्रत्येक ठिकाणी नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्राकडून अळीनाशकांचा वापर करून डासांची साखळी तोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचवेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांच्या मार्गदर्शनानुसार नेरळ गावातील डेंग्यूचे रुग्ण आढळून आलेल्या भागात आरोग्य कर्मचारी यांच्याकडून सर्वेक्षण केले जात आहे. डेंग्यू रुग्ण आढळून आलेल्या ठिकाणी आसपासचे ५० घरांचे असे सर्वेक्षण सुरू असून, प्राथमिक आरोग्य केंद्राचे डेंग्यूचे डासांची साखळी तोडण्यासाठी पाणी साठून राहिलेले ठिकाणी शोधण्याचे काम करीत असल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गुरव यांनी दिली.

नेरळ गावात एकाच महिन्यात डेंग्यूचे रुग्ण आढळून आले आहेत,त्यातील एका रुग्णाचा मृत्यू १३ सप्टेंबर रोजी झाला असून, प्राथमिक आरोग्य केंद्राने गावातील रहिवाशांसाठी नियमावली बनवून ग्रामपंचायत प्रशासनाकडे दिली होती. त्या नियमावलीबद्दल जनजागृती करून गावातील डेंग्यूचे डास यांचे निर्मलून करण्याचा प्राथमिक आरोग्य केंद्राचा उद्देश होता. मात्र १५ दिवसांत तीनवेळा पत्र देऊनदेखील ग्रामपंचायतीकडून मागील १५ दिवसांत एकही फलक लावले गेले नाहीत किंवा रिक्षामधून दवंडीदेखील पिटविण्यात आली नाही .त्यामुळे नेरळ गावातील डेंग्यूचे रुग्ण वाढण्यास नेरळ ग्रामपंचायत प्रशासन जबाबदार असणार आहे. मात्र, उद्या सोमवारी नेरळ ग्रामपंचायत डेंग्यू बद्दल जनजागृती करणारे फलक लावले जातील, अशी माहिती ग्रामपंचायतीकडून मिळाली आहे.

## शेतकऱ्यांचा राडा

शेतकऱ्यांना पुरस्कार देण्यात आला. यानंतर राज्य शासन देत असलेला पुरस्कार आम्हाला राज्यपालांच्या हस्तेच हवा आहे, असं शेतकऱ्यांचं म्हणणं होते. यावेळी कृषीमंत्री धनंजय मुंडे या ठिकाणी पोहोचले आणि त्यांनी शेतकऱ्यांना राज्यपालांच्या हस्ते पुरस्कार देऊ, असे आश्वासन दिल्यामुळे शेतकरी शांत झाले. पण याआधी शेतकऱ्यांनी फेटे स्टेजच्या दिशेने फेकत गोंधळ घातल्याचा पाहायला मिळाले. या पुरस्कार सोहळ्यात राज्य शासनातर्फे सन २०२० ते २०२३ या वर्षीच्या ४४८ पुरस्कार्थींचा पुरस्कार वितरण व सत्कार करण्यात आला.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यांत येते की, खालील वर्णनाची मिळकत ही सध्या श्री. सचिन बंडू पाटील, सौ. वर्षा विकास कांबळे, श्री. संदेश बंडू पाटील, श्री. भिकू दत्तात्रेय पाटील, श्री. खंडू दत्तात्रेय पाटील व सौ. लिला हरिचंद्र कडवे सर्व रा. आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, यांचे सर्वांचे नावे ७/१२ सदरी नोंदविलेली आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

-: मिळकतींचे वर्णन :-

| मौजे | गट नं. | हि.नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| टेकाळी | ११६ | ० | ०.०७.१० | १.५० |

सदर मिळकती बाबत विविध कोर्टात दावे सुरु असुन उच्च न्यायालय मुंबई येथे अपिलाचे काम देखील सुरु आहे. या मिळकतीबाबतज माझे अशील जगदीश नारायण पाटील, रा. मु.पो. आवास, ता.अलिबाग, जि. रायगड राजन नारायण पाटील रा. महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड कॉलनी, बि.नं. २३, बोरीवली मुंबई, शारदा महेश पांचाळ, मु.पो. आवास, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी अलिबाग येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा क्र. २०/२०२० हा सदर श्री. सचिन बंडू पाटील, सौ. वर्षा विकास कांबळे, श्री. संदेश बंडू पाटील, श्री. भिकू दत्तात्रेय पाटील, श्री. खंडू दत्तात्रेय पाटील व सौ. लिला हरिश्चंद्र कडवे यांचे विरुद्ध त्यांनी अनाधिकाराने घेतलेले रक्कमेची वसुलीकरिता दाखल केलेला आहे. या दाव्यामधे वर वर्णन केलेली मिळकत ही वाद मिळकत आहे व सदर मिळकतीचे विक्री बाबत याच दाव्यामधे मनाई हुकुम मिळण्याकरीताचा अर्ज देखील प्रलंबित आहे. याबाबतची माहिती श्री. सचिन बंडू पाटील, सौ. वर्षा विकास कांबळे, श्री. संदेश बंडू पाटील, श्री. भिकू दत्तात्रेय पाटील, श्री. खंडू दत्तात्रेय पाटील व सौ. लिला हरिश्चंद्र कडवे यांना आहे. मात्र तरीही सदर व्यक्ती या मिळकतीचे ७/१२ सदरी आपले नाव दाखल आहे या गोष्टीचा गैरफायदा घेत माझे अशील व खरेदीदार यांची फसवणुक करण्याचे उद्देशाने सदरहू मिळकत विक्री करण्याचे विचारात आहेत असे माझे अशीलांना खात्रीलायकरीत्या कळले आहे. या कारणाने सर्व लोकांना मिळकतीबाबत सुरु असलेले विविध दावे/अपीले यांचेबाबत अवगत करण्याकरीता ही जाहीर नोटीस माझे अशीलांमार्फत प्रसिद्ध करण्यात येत आहे.

सबब, सर्व लोकांस हे जाहीर करण्यात येत आहे की, या मिळकतींबाबत कोणीही श्री. सचिन बंडू पाटील, सौ. वर्षा विकास कांबळे, श्री. संदेश बंडू पाटील, श्री. भिकू दत्तात्रेय पाटील, श्री. खंडू दत्तात्रेय पाटील व सौ. लिला हरिश्चंद्र कडवे यांचेसोबत कसल्याही प्रकारचा खरेदी व्यवहार/करार मदार करु नये. अशाप्रकारे कोणी काही व्यवहार या मिळकतीसंदर्भात वर नमुद व्यक्तींसोबत केल्यास तो माझे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाही. याप्रकारे करार/व्यवहार केल्या कारणाने कोणाही व्यक्तीचे काही नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधित असा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचीच असेल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

हे सर्वास कळविले.

अलिबाग
दिनांक : २९/९/२४

स्वाक्षरीत/-
Cjayant Law Office
**ॲड. जयंत ह. चेऊलकर**
२०१, सृष्टी, २ रा मजला,
वेधशाळेसमोर, ता. अलिबाग, जि. रायगड



मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

### मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव बुधवार दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार भरणा करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. डॉ. प्रणिता विवेक मांजरेकर, पत्ता:- कोशिंबळे त. तळे, पो. विघवली, ता. माणगाव जि. रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री सुरेश शंकर बक्कम, पत्ता :- कोशिंबळे त. तळे, पो. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड<br>३. श्री चेतन रामभाऊ मंचेकर, पत्ता :- मु.पो. तळाशेत, ता. माणगाव, जि.रायगड<br>**तारणदार-**<br>४. श्री. रमेश मनोहर देशमुख, पत्ता :- कोशिंबळे त. तळे, पो. विघवली, ता. माणगाव, जि. रायगड | अर्ज क्र. ११/२०२२ जा.क्र.सनिमा/का-२ /राजिमस बँक/ क-१०१/वदा/ अ.क्र.१/७०७, २०२२ दिनांक ०३/०३/२०२२ | रू. ४५,००,०००/-<br>रू. ७२,५०,०००/-<br>रू. ७६,२५,०००/-<br>रू.१,८७,५०,०००/-<br><br>रू. ९,५३,०००/- | मौजे कोशिंबळे त. तळे हद्दीतील मालमत्ता-<br>१. गट क्र. ९६/४३, क्षेत्र ०.१८.० हे.आर.<br>२. गट क्र. ९६/५१, क्षेत्र ०.२९.० हे.आर.<br>३. गट क्र. ८७/४, क्षेत्र ०.३०.० हे.आर.<br>४. गट क्र. ९६/२०, क्षेत्र ०.७५.० हे.आर.<br>५. गट क्र. ४६८, क्षेत्र ०.९५.३ हे.आर. |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ३०/०९/२०२४

**श्री.अे.पी. बारटक्के**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**



### ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा
### ता. माणगांव, जि. रायगड

नोटीस बोर्ड प्रसिद्ध दि. २६/९/२०२४

**निविदा सूचना**

ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा खालील कामाकरिता जास्तीत जास्त नोंदणीकृत, इच्छीत ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहरबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तसेच सदरचे निविदा व दरपत्रक दि. ४/१०/२०२४ पर्यंत ग्रामपंचायत कार्यालय मोर्बा येथे दुपारी १२.०० वाजेपर्यंत सादर करावे.

| अ. क्र. | कामाचे नांव | योजनेचे नांव | अंदाजपत्रक रक्कम | काम पूर्ण करावयाचा कालावधी | १ % इसारा रक्कम | कोरे निविदा फॉर्म फी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राऊत मोहल्ला दर्गा सुशोभीकरण करणे | अल्पसंख्यांक | ६९९६०१ | ६ महिने | ६९९६ | २००/- |
| २ | शाळा दुरूस्ती करणे | १५ वा वित्त | २००००० | ३ महिने | २००० | २००/- |
| ३ | रोहिदास वाडी स्टोर रूम बांधणे | १५ वा वित्त | ७५०००० | ३ महिने | ७५० | २००/- |
| ४. | नजीबुल्ला धनसे व सुलेमान चीलवन यांच्या घराकडील रस्ता | १५ वा वित्त | २५०००० | ३ महिने | २५०० | २००/- |
| ५ | अब्दुला अजिज धनसे ते जलील धनसे यांच्या घराकडील रस्ता | १५ वा वित्त | १५०००० | ३ महिने | १५०० | २००/- |
| ६ | सुरले समाजमंदिर दुरुस्ती करणे | १५ वा वित्त | १००००० | ३ महिने | १००० | २००/- |
| ७ | मागासवर्गीय वस्तीत वैयक्तिक नळ कनेक्शन | १५ वा वित्त | ३००००० | ३ महिने | ३००० | २००/- |
| ८ | मोर्बा अंतर्गत वैयक्तिक नळ कनेक्शन | १५ वा वित्त | ३००००० | ३ महिने | ३००० | २००/- |
| ९ | नाईटणे स्मशान शेड दुरूस्ती | १५ वा वित्त | १००००० | ३ महिने | १००० | २००/- |
| १०. | सुरले येथे गटार बांधणे | १५ वा वित्त | १००००० | ३ महिने | १००० | २००/- |
| ११ | निजाम मापकर ते फरशी गटार | १५ वा वित्त | १००००० | ३ महिने | १००० | २००/- |
| १२ | ग्रामपंचायत परिसर सुशोभीकरण | १५ वा वित्त | १५०००० | ३ महिने | १५०० | २००/- |
| १३ | भीमनगर डोंगर येथे पायऱ्या बांधणे | १५ वा वित्त | ५०००० | ३ महिने | ५०० | २००/- |

**अटी व शर्ती-**
१) प्राप्त निविदा दि. ४/१०/२०२४ रोजी दु. १२.०० वाजता ग्रा. पं. मोर्चा येथे उपस्थिताच्या समक्ष मा. सरपंच यांच्या हस्ते उघडणेत येतील.
२) कोणतेही एक अथवा अनेक निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा अधिकार सरपंच मोर्बा यांनी राखून ठेवला आहे.
३) प्रत्येक देयकाकडून शासन नियमाप्रमाणे रक्कमा कपात केल्या जातील. मा. उपअभियंता सो. बांधकाम उपविभाग माणगाव यांचेकडील तांत्रिक अधिकारी व पं.स. माणगाव बांधकाम अभियंता तसेच ग्रा.पं. चे पदाधिकारी सदस्य यांचे मार्गदर्शन व देखरेखीखाली सदर काम करणेचे असून, काम समाधानकारक नसेल तर त्याच स्थितीत बांबून कार्यारंभ आदेश रद्द करणेचा अधिकार ग्रा.पं.ने राखून ठेवला आहे.
४) कामाचे देयकातून शासकीय कपाती वजा करून देयक अदा केले काईल. काम अंतिम रित्या पूर्ण झाल्यानंतर ६ महिन्या नंतर कामाची स्थिती पाहून कपात केलेली सुरक्षा अनामत परत केली जाईल.
५) नोंदणीकृत ठेकेदार उपलब्ध न झाल्यास स्थानिक ठेकेदाराच्या निविदाचा विचार केला जाईल.

**सही/-**
**ग्रामविकास अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**
**ता. माणगाव, जि. रायगड**

**सही/-**
**ग्रुप ग्रामपंचायत मोर्बा**
**ता. माणगाव, जि. रायगड**



मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

### मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर लिलाव बुधवार दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु. ५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. श्री. प्रसाद महादेव विचारे पत्ता:- मु.पो. संदेरी, ता. म्हसळा, जि. रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री धर्मराज महादेव कोळी, पत्ता :- मु. चिंचवली, पो. गोरेगाव, ता. म्हसळा, जि. रायगड<br>३. श्री प्रकाश विठोबा पवार, पत्ता :- मु. दहिवली, बौद्धवाडी, पो. दहिवली, ता. म्हसळा जि.रायगड<br>**तारणदार-**<br>४. सौ. पार्वती महादेव विचारे, पत्ता :- मु.पो. संदेरी, ता. म्हसळा, जि. रायगड<br>५. सौ. कल्पना यशवंत सावंत, पत्ता :- मु.पो. संदेरी, ता. म्हसळा, जि. रायगड<br>६. सौ. सुषमा शंर सावंत, पत्ता :- मु.पो. संदेरी, ता. म्हसळा, जि. रायगड<br>७. सौ. वसुधा विजय सावंत पत्ता :- मु.पो. संदेरी, ता. म्हसळा, जि. रायगड | अर्ज क्र. २२/२०२१ जा.क्र.५६८ कलम/ कलम-१०१/सन २०२१, दिनांक २९/१२/२०२१ | रू. २,६६,०००/- | श्रीमती पार्वती महादेव विचारे, श्री. प्रसाद महादेव विचारे, श्रीमती कल्पना यशवंत गुजर, श्रीमती सुषमा शंकर गुजर, श्रीमती वसुधा विजय सावंत यांचे नावे असलेली मौजे संदेरी गाव, ता. म्हसळा, जि. रायगड येथील गट क्र. ५२/७, क्षेत्र ०.७६.०० हे.आर.ही मालमत्ता |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ३०/०९/२०२४

**श्री.एस.जि. शिर्के**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

**निवडक**

### गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**चिरनेर :** उरण तालुका माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघातर्फे दहावीच्या प्रत्येक माध्यमातील गुणवंत विद्यार्थ्यांचा व बारावीच्या परीक्षेतील प्रत्येक शाखेतील गुणानुक्रमे पहिल्या पाच गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मोरा येथील जे एम म्हात्रे चॅरिटेबल ट्रस्टचे न्यू इंग्लिश स्कूल उरण येथे हा गौरव सोहळा आयोजित करण्यात आला होता. उरणच्या गटशिक्षणाधिकारी प्रियांका पाटील यांच्या उपस्थितीत या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना प्रशिस्तपत्र देऊन गौरविण्यात आले.

### पावसामुळे शेतीचे नुकसान

**सुकेळी :** परतीच्या पावसाने संपूर्ण रोहा तालुक्यासह नागोठणे, सुकेळी परिसरामध्ये धुमाकूळ घातला आहे. या परतीच्या पावसाचा फटका सर्वच शेतकऱ्यांना बसला आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या परतीच्या पावसाने हिरावून घेतला आहे. भातपिकांचे ऐन कापणीला सुरूवात होत असतांनाच या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. परिपक्व झालेले भाताचे पिक हे जमिनीवर पडुन पुन्हा त्याला कोंब येत आहेत. अशा परिस्थितीमुळे शेतकरी मोठ्या चिंतेत सापडला आहे.

### अतिक्रमणांवर कारवाई

**पनवेल :** सिडको क्षेत्रात कोणताही विकास परवाना न घेता करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याचे सत्र सिडकोतर्फे हाती घेण्यात आले आहेत. त्यानुसार सिडकोच्या मुख्य नियंत्रक, अनधिकृत बांधकामे (न.मुं) विभागामार्फत तळोजा नोड येथे निष्कासन मोहिम राबवून तळोजा-पीएमएवाय हायवेला लागून असलेली हॉटेल क्लासिक, ८ गॅरेजेस तसेच इतर अनधिकृत रोड लगत असलेली दुकाने यशस्वीरीत्या हटविण्यात आली.

### वार्षिक सर्वसाधारण सभा

**पाली :** सुधागड तालुका शेतकरी उत्पादक सहकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा चेअरमन मिलिंद गोळे यांच्या अध्यक्षतेखाली पेडली येथे संपन्न झाली सभेसाठी आवश्यक सभासद गणपूर्ती होती. यावेळी संस्थेचा मागील एका वर्षाचा लेखा जोखा, कार्य अहवालाची माहिती, संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी जयदीप गोळे यांनी दिली. शेतकरी बांधव यांना देण्यात येणाऱ्या सेवा व उत्पादन वाढ आणि मूल्यवृध्दीसाठी संस्था कशी कार्यरत आहे याची माहिती गोळे यांनी दिली.

### आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

**नेरळ :** माणगाव वाडीमध्ये असलेल्या मधुरम चॅरिटेबल ट्रस्टचे आदिवासी आश्रमशाळा मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात आश्रमशाळेतील १२ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे संचालक माधव गायकवाड, मुंबई महानगर पालिका मधील अधिकारी वर्ग, मुख्याध्यापक नंदकुमार इकारे आदी सह शिक्षक वर्ग उपस्थित होता.अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या १२ विदयार्थ्यांना प्रत्येकी दोन हजार रुपयांची शिष्यवृत्तीचे वाटप करण्यात आली.

# माझी वसुंधरा अभियानात रायगडचा डंका

## खालापूर तालुक्यातील ३ ग्रामपंचायतींना पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

राज्य शासनाच्या माझी वसुंधरा ४.० अभियानात रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी बजावली आहे. अभियानांतर्गत खालापूर तालुक्यातील वडगाव, तांबाटी, साजगाव ग्रामपंचायतींना पुरस्कार जाहीर झाला असून, कोकण विभागात सर्वोत्तम कामगिरीत रायगड जिल्हा परिषद अव्वल ठरली आहे.






भूमी, वायू, जल, अग्नी आणि आकाश या निसर्गाच्या ५ घटकांवर आधारित ‘ माझी वसुंधरा अभियान ४.०’ हे अभियान १ एप्रिल २०२३ ते ३१ मे २०२४ या कालावधीत राबविण्यात आले. या अभियानात रायगड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला होता. माझी वसुंधरा अभियान ४.० चे मूल्यमापन क्षेत्रीय मूल्यमापन समितीने प्रत्यक्ष भेटी देऊन केले व राज्य शासनाला अहवाल सादर केला होता.

माझी वसुंधरा अभियान ४.० मध्ये ५ ते १० हजार लोकसंख्या असणाऱ्या गटात खालापूर तालुक्यातील वडगाव ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला तर राज्यात सातवा क्रमांक मिळविल्याने ग्रामपंचायतीला ५० लाख रुपये बक्षीस प्राप्त होणार आहे. तर २ हजार ५०० ते ५ हजार लोकसंख्या असलेल्या गटात खालापूर तालुक्यातील तांबाटी ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला तर राज्यात ७ वा क्रमांक पटकाविला असून, साजगाव ग्रामपंचायतीने कोकण विभागात पहिला तर राज्यात १० वा क्रमांक पटकाविला आहे. यामुळे तांबाटी ग्रामपंचायतीला ५० लाख तर साजगाव ग्रामपंचायतीला १५ लाख रुपये बक्षीस प्राप्त होणार आहे.

अभियानाच्या सुरुवातीपासून रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक प्रियदर्शनी मोरे, ग्रामपंचायत विभाग उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र भालेराव, खालापूर पंचायत समिती गटविकास अधिकारी संदीप कराड, माझी वसुंधरा उपक्रम कोकण विभाग तज्ञ अमोल पडळकर, पंचायत समिती अधिकारी यांनी ग्रामपंचायतींना मार्गदर्शन केले. संबंधित ग्रामपंचायतींचे ग्रामसेवक, लोकप्रतिनिधी यांनी ग्रपांचायात हद्दीत उपक्रम राबविण्यासाठी विशेष मेहनत घेतल्याने हे यश प्राप्त झाले आहे.

> **रायगड जिल्ह्यातील पुरस्कार प्राप्त वडगाव, तांबाटी, साजगाव ग्रामपंचायतींचे तसेच ग्रामसेवक, नागरिकांचे अभिनंदन. यापुढे जिल्ह्यात हवेचा दर्जा सुधारण्यासाठी विशेष लक्ष पुरविण्यात येईल. वृक्षारोपण, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सौरऊर्जा दृष्टीने मोहीम राबविण्यात येईल. डिजिटल स्कूलच्या माध्यमातून शिक्षण अधिक दर्जेदार करण्यात येत आहे. तसेच शाश्वत पर्यावरण चळवळ सक्रिय करण्यासाठी नागरिकांनी सहभाग नोंदवित योगदान द्यावे.**
>
> **: डॉ. भरत बास्टेवाड मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड जिल्हा परिषद.**

# माझी वसुंधरा अभियान

**। पनवेल । वार्ताहर ।**

राज्य शासनाच्यावतीने राबविण्यात येणाऱ्या माझी वसुंधरा ४.० या अभियानात पनवेल महानगरपालिकेने राज्यात पहिला क्रमांक मिळवला आहे. ३ लक्ष ते १० लक्ष लोकसंख्या श्रेणीत राज्यस्तरावर पहिला क्रमांक मिळवल्याबद्दल पनवेल पालिकेस ७ कोटी रुपयांचे पारितोषिक मिळणार असून त्याचे वितरण लवकरच होणार आहे.

राज्य शासनाच्यावतीने पर्यावरण संवर्धनाला चालना मिळावी, यासाठी माझी वसुंधरा हे अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा चौथा टप्पा सुरु असून यात पनवेल पालिकेने सहभाग नोंदवला होता. सहभाग नोंदवल्यानंतर पर्यावरण पुरक प्रकल्प उभारणीसाठी पुढाकार घेतला होता. याचबरोबर शहरातील वातावरणातील प्रदुषण पातळी कमी करण्यासाठीचे

**राज्यात पनवेल अव्वल : सात कोटींचे ठरणार मानकरी**

उपक्रम राबवत पनवेल शहरासह परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण, संगोपनाचे काम हाती घेतले होते.या अभियानांतर्गत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे राज्य शासनाच्यावतीने मूल्यांकन करण्यात आले होते. यानुसार माझी वसुंधरा अभियान ४.० चा निकाल शासनाच्यावतीने जाहीर केला. ३ ते १० लाख लोकसंख्येच्या निकषात या गटात पनवेलसह इतर पालिकांचा सहभाग होता. यात पनवेल पालिकेने बाजी मारत राज्यस्तरावर पहिला क्रमांक मिळवला. अभियानातील पहिल्या क्रमांकाबद्दल पनवेल पालिकेस सात कोटींचे बक्षीस जाहीर झाले आहे.

# समुद्रकिनारी सापडला मृतदेह

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कोळगांव येथील समुद्रकिनारी एका अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला. या घटनेने परिसर खळबळ उडाली असून याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असल्याचे मांडवा सागरी पोलिसांनी कळविले आहे.

अलिबाग तालुक्यातील मांडवा बंदरापासून काही अंतरावर कोळगाव गावाच्या समुद्रकिनारी फेरफटका मारत असताना गुरुवारी सायंकाळी सव्वा चार वाजण्याच्या सुमारास एका इसमाचा मृतदेह कांदळवनाच्या झाडीत स्थानिकांना दिसून आला. याबाबत स्थानिकांनी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात या घटनेची माहिती देताच मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक दिपक भोई यांच्यासह त्यांच्या टीमने घटनास्थळी धाव घेतली.

मृतदेहाची पाहणी करून त्यांच्या ओळखीचे काही पुरावे असल्याची माहिती घेतली. परंतु काहीही सापडले नाही. अनोळखी पुरुष जातीच्या मृतदेहाचे वय अंदाजे ४० वर्षे असून अंगात काळपट चौकटीचा शर्ट व काळ्या रंगाची फुल पॅन्ट घातलेली असे वर्णन आहे. आठ दिवसांपूर्वी मृत झाला असून तो बाहेरील असल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे. याप्रकरणी आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

**सुगवे पिंगळेवाडी येथील घटना**

# दुचाकी- कंटेनरची समोरासमोर धडक

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मुरबाड कर्जत राष्ट्रीय महामार्ग रस्त्यावर सुगवे पिंगळेवाडी येथील वळणावर दुचाकी आणि कंटेनर यांच्यात समोरासमोर धडक होऊन अपघात झाला आहे. जखमींवर नवी मुंबई येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



सुगवे पिंगळेवाडी येथील एका अवघड वळणावर दुचाकी चालक रोहीदास नारायण कांबडी हे सराईवाडी येथील आपल्या सासुरवाडीला आले होते. सकाळी सुगवे येथील सलूनमधून केस कापून घरी एकनाथवाडीला जात असताना पिंगळेवाडी वळणावर सकाळी नऊ ते साडे नऊच्या दरम्यान कंटेनर भरधाव वेगाने कर्जतच्या दिशेने येत होता. यावेळी समोरासमोर दुचाकी आणि कंटेनरची धडक झाली. त्यात रोहिदास कांबडी रस्त्यावर पडून रस्त्याच्या बाजूला फेकला गेला त्याचा रक्तस्राव जास्त झाल्याने त्याला तात्काळ ग्रामीण रुग्णालय कशेळे येथे उपचारासाठी नेण्यात आले. दुचाकीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. कंटेनरचे काहीही नुकसान झाले नाही.

रोहिदास कांबडी यांना डॉक्टरांनी तपासणी केली असता रोहीदास कांबडी यांची तब्येत बरी असून पायाला व हाताला जबर मार लागला आहे. त्यांच्या एका कानातून रक्त येत आहे. असे डॉक्टरांना तपासणीत दिसून आले आहे. डॉक्टरांनी तात्काळ वाहनचालक रोहीदास कांबडी यांना पनवेल येथील एमजीएम दवाखान्यात पुढील उपचारासाठी पाठविले आहे. सदर अपघाताचा पुढील तपास कर्जत पोलीस ठाण्याच्या कशेळे आऊट पोस्ट पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार लालासाहेब थोरने, पोलीस हवालदार राहुल जाधव हे करत आहेत.

# झाड कोसळून वाहनांचे नुकसान

**। पनवेल । वार्ताहर ।**

दोन-तीन दिवस संतत पडणाऱ्या पावसाचा फटका कळंबोलीतील पदपथावर असलेल्या दहा ते बारा वर्षे वयाच्या वृक्षाला बसला. सदरचे झाड उन्मळून पडल्याने ते रस्त्यावर उभ्या असलेल्या बाजूच्या गाड्यांवर कोसळले.



त्यामुळे गाड्यांचे नुकसानही झाले. मात्र सदरची घटना समजतात कळंबोली अग्निशामक दलातील उप अधिकारी दिलीप पाटील यांनी आपल्या पथकासह धाव घेऊन पडलेले झाड मोकळे करून अन्य गाड्यांचेही नुकसान होण्याचे टाळले.

कळंबोली वसाहतीमधील मुख्य रस्त्यावर बस स्टॉपच्या समोर सेक्टर ३ मधील पदपथावरील जांभळीचे झाड शुक्रवारी पहाटे मुळासकट उपटून पडले. भले मोठे झाड असल्याने ते कोसळल्यानंतर बाजूला उभ्या असलेल्या गाड्यांवर पडले. तसेच रस्ता ही पूर्ण व्यापला गेला. यामध्ये दोन गाड्यांचे नुकसानही झाले.

सदरची घटना घडल्यानंतर रात्री तैनात असलेले अग्निशामक उप अधिकारी दिलीप पाटील यांनी आपल्या जवानांसह घटनास्थळी धाव घेऊन कोसळलेले झाडाचे तुकडे करून आजूबाजूच्या अन्य गाड्यांना नुकसान न होता रस्त्यावरून बाजूला केले. त्यामुळे वाहतूकही पूर्ववत झाली व अन्य गाड्यांचे नुकसान होण्याचेही टळले.

मात्र यामध्ये दोन गाड्यांचे नुकसान झालेले आहे. पदपथावर गेले दहा ते पंधरा वर्षांपासून उंच वाढलेले जांभळाचे झाड हे मुळासकटच कोसळले. संततधार पावसामुळे जमीन भुसभुशीत झाल्यामुळे झाड पडले असावे असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

# नवरात्रौत्सव मंडळांनी अधिकृत वीजजोडणी घ्यावी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

■ **महावितरणने केले आवाहन**

सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळांनी सवलतीच्या दराने तात्पुरत्या स्वरूपात उपलब्ध असलेली अधिकृत वीजजोडणी घ्यावी. उत्सव मंडळांनी उत्सवातील देखावे, मंडप, रोषणाई व वीज सुरक्षेतील त्रूटीमुळे होणारे संभाव्य अपघात टाळण्यासाठी गांभिर्यपूर्वक उपाययोजना कराव्यात, असे आवाहन महावितरणने केले आहे.

महावितरणकडून नवरात्र उत्सव मंडळांना घरगुती वीज ग्राहकांच्या दराने वीजपुरवठा देण्यात येणार आहे. उत्सवाच्या कालावधीत संभाव्य धोके टाळण्यासाठी वीजयंत्रणेची योग्य काळजी घ्यावी. मंडपाची व रोषणाईसाठी विद्युत व्यवस्था व संच मांडणी ही अधिकृत विद्युत कंत्राटदारांकडूनच करून घेणे आवश्यक आहे. मंडपातील वीजयंत्रणेचे अर्थिंग सुस्थितीत असल्याची खात्री करून घ्यावी. मंडळाच्या अंतर्गत वायरचे इन्सूलेशन खराब झाल्यास अशा वायर्समधून मंडपाच्या लोखंडी पत्र्यांमध्ये किंवा ओल्या वस्तुंमध्ये विद्युत प्रवाह येऊ शकतो. हा प्रकार टाळण्यासाठी वायर्सचे जोड काढून टाकावेत किंवा योग्य क्षमतेच्या इन्सूलेशन टेपने जोड देण्यात यावा. स्वीचबोर्डच्या मागे प्लायवूड किंवा लाकडी फळी लावावी. विजेच्या लघुदाब, उच्चदाब वाहिनी व रोहित्रांचा नवरात्र उत्सवातील आणि मिरवणुकीतील देखाव्यांना स्पर्श होणार नाही, याची काळजी घ्यावी. वीजपुरवठा बंद असताना जनरेटर सुरू केल्यास एकाच न्युट्रलमुळे जनरेटरमधील वीज ही लघुदाब वाहिनीत प्रवाहित होते आणि त्यातून प्राणांतिक अपघात घडतात. नवरात्र उत्सवाच्या पदाधिकाऱ्यांनी संबंधीत क्षेत्रातील महावितरणचे अभियंता व कर्मचारी यांचे भ्रमणध्वनी क्रमांक नोंदवून ठेवावेत. असे आवाहन महावितरणने केले आहे.

# नवरात्रौत्सवाचे लागले वेध

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

गणेशोत्सवानंतर भाविकांना आता नवरात्रौत्सवाचे वेध लागले असून येत्या ३ ऑक्टोबर रोजी देवीची घटस्थापना करण्यात येणार आहे. तालुक्यातील सर्वच ठिकाणी गणेश कला मंदिरात ही देवी बनवण्याचं काम जोरदार सुरू आहे. हुबेहूब देवी बनवण्याचं काम म्हटलं की डोळ्यासमोर येतात त्या आशिष खोतच्या सुबक आणि सुप्रसिद्ध देवीची मूर्ती सुंदर अशी नयनांची युग्मता ,पाणीदार आणि जिवंत डोळे तसेच विविध प्रकारच्या रंगसंगतीने या मूर्तीकडे भक्त आपोआपच आकर्षिले जातात.



मुरूड बाजारपेठेतील चंद्रकांत खोत यांनी ७० वर्षांपूर्वी गणेश कला मंदिराची स्थापना केली होती यामध्ये शाडुच्या मातीच्या आकर्षक गणेशमूर्ती व देवीच्या मूर्ती घडविण्याचं काम करित तिच परंपरा त्याचा मुलगा आशिष खोत यांनी सुरू ठेवली आहे. त्याच्या बरोबर अथर्व खोत काम उत्तमपणे मूर्ती घडविण्याचं काम करित आहेत. खोत गणेश कला मंदिराला साथ देण्यासाठी बाळकृष्ण पाटील, अजय जंजिरकर, सनी पुलेकर, अनूज मसाला, बाळकृष्ण मसाल करतात. यांच्या देवीच्या मूर्तींना शहरांसह पंचक्रोशी भागात मागणी जास्त असते.

मुरुड पोलीस ठाणे हद्दीत सार्वजनिक ५६ व खासगी ८ अशा देवीची घरगुती प्रमाणे स्थापना करून पारंपरिक पद्धतीने पूजा केली जाते. नवरात्रौत्सवामध्ये लागणाऱ्या वस्तुंची बाजारपेठ सजू लागली आहे.

# न्हावाशेवा वाहतूक पोलिसांची कामगिरी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

**१८५३ अवजड वाहनांवर कारवाई ; २१ लाखांचा केला दंड वसुल**

न्हावाशेवा वाहतूक पोलीस पथकाने रस्त्यावर बेकायदेशीर उभ्या असलेल्या आणि महामार्गांवर वाहतुकीस अडथळा निर्माण करुन अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या अवजड वाहनांवर कडक कारवाईचा बडगा उगरला असून,मागील ७ महिन्यांपासून या न्हावाशेवा वाहतूक पोलिसांनी १८५३ अवजड वाहनांवर कारवाई केली असून सुमारे २१ लाख रुपयांचा दंड वसुल केला आहे.

जेएनपीए बंदर परिसरातील व जेएनपीए - पनवेल महामार्गासह मुंबई जोडणाऱ्या न्हावा-शिवडी अटल सेतू महामार्गावरील अवजड कंटेनर ट्रेलर,टँकर व डंपर अशा वाहनांवर न्हावाशेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जी.एम.मुजावर यांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई करण्यात आली.

जेएनपीए परिसरात केंद्र शासनाने सहा व आठ पदरी महामार्ग साकारले आहेत. त्यामुळे वाहतूक कोंडी आता विशेषतः जाणवत नाही.मात्र रात्रीच्या वेळी अवजड वाहनचालक बेशिस्त वाहन चालवित असल्याने त्यांच्यावर दंडात्मक कारवाई सुरूच ठेवण्यात आल्याने वाहन चालकांनी शिस्तीने योग्यतेने वाहन चालविणे पसंत केले असल्याचे जाणवत आहे.

**राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या इशाराची दखल**

# जेएनपीटी महामार्गावर खड्डे बुजवण्यास सुरुवात

**। पनवेल । वार्ताहर ।**

■ **काही तासांमध्ये राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाची उपाययोजना**

■ **ॲड. तुषार पाटील यांच्या पाठपुराव्याला आले यश**

कोट्यवधी रुपये खर्च करूनही वाहनांना खड्ड्यातून वाट काढत जावे लागत होते. त्याचबरोबर टायर फुटून आर्थिक नुकसान आणि जीविताच्या धोक्याला निमंत्रण देण्याची स्थिती राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ब वर निर्माण झाली होती. यासंदर्भात राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सरचिटणीस ॲड.तुषार पाटील यांनी आक्रमक भूमिका घेत प्रकल्प अधिकाऱ्यांना निवेदन दिले. यासंदर्भात आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर काही तासांमध्येच खड्डे बुजवण्यास सुरुवात झाली आहे. यामुळे अवजड आणि चार चाकी वाहन चालकांना काहीसा दिलासा रिळाला आहे.

जेएनपीटी हे देशातील सर्वात मोठ्या बंदरापैकी एक आहे. येथे मालाची ने आण करण्याकरिता अनेक ठिकाणाहून ट्रेलर कंटेनर ये-जा करतात. एकंदरीतच अवजड वाहनांची संख्या जास्त आहे. याकरता जवळपास ३००० कोटी रुपये खर्च करून राष्ट्रीय महामार्ग ४ बी चे रुंदीकरण करण्यात आले. त्याचबरोबर या मार्गिका काँक्रीट करण्यात आल्या. मुंबई- गोवा मुंबई- पुणे आणि इतर ठिकाणी जाण्याकरीता याच रस्त्याचा अवलंब केला जातो. त्याचबरोबर अटल सेतू मुळे काही मिनिटांमध्ये मुंबई गाठता येते. या सागरी मार्गावर जाण्यासाठी याच जेएनपीटी हायवेचा अवलंब करावा लागतो. यामुळे अवजड बरोबरच आता चार चाकी वाहनांची संख्या सुद्धा दिवसेंदिवस वाढत चाल-ली आहे. एकीकडे मुंबई जवळ आली असल्याचे सांगितले जात असताना दुसरीकडे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४ ब वर ज्या ज्या ठिकाणी उड्डाण पूल आहेत. तेथे सिमेंट काँक्रीट करण्यात आले



नसल्याने उन्नत मार्ग डांबरीचे आहेत. त्याच्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडल्याने. टायर फुटण्याचे प्रकार घडत आहेत. मुंबई बाजूकडून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक चार ला जोडल्या गेलेल्या उड्डाण पुलाच्या तोंडावर दोन अडीच फूट खड्डे पडल्याने त्यामुळे जवळपास २५ ते ३० वाहनांचे टायर फुटले. दुर्दैवाने कोणती जीवित हानी झाली नसली तरी वाहनांचे नुकसान झाले आहे.

**लवकरच काँक्रिटने खड्डे भरणार!**

**मेसर्स अशोक बिल्डकोन लिमिटेड या कंपनीने महामार्गाच्या काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण केले. परंतु या एजन्सीचा कालावधी संपुष्टात आल्याने त्याचबरोबर जास्त पाऊस पडल्यामुळे दुरावस्था झाल्याचे उघड झाले आहे. प्राधिकरणाने ही गोष्ट मान्य सुद्धा केली आहे. यासाठी नवीन एजन्सी नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव देण्यात आला असून त्याला मंजुरी मिळाली आहे. दरम्यान सद्यस्थितीत मेसर्स सी एस इंजीनियरिंग सर्विसेस यांच्यामार्फत पेवर ब्लॉक, जीएसबी मटेरियल व काँक्रीटने खड्डे भरण्याचे काम हाती घेण्यात आले असल्याचे प्रकल्प संचालक यशवंत घोटकर यांनी तुषार पाटील यांनी दिलेल्या लेखी उत्तरात म्हटले आहे.**

# न सांगितलेल्या गोष्टी

मालवणातील छत्रपती शिवाजीमहाराजांचा पुतळा पडल्याप्रकरणी नेमलेल्या समितीचा अहवाल आला आहे. ३५ फुटांचे वजन पेलवेल असे याचे डिझाईन नव्हते असे त्यात म्हटले आहे. म्हणजे अत्यंत बेपर्वाईने हा पुतळा तयार केला गेला आणि तितक्याच बेजबाबदार घाईघाईने तो उभारण्यात आला हे स्पष्ट आहे. या संदर्भात शिल्पकार आपटे याला अटक झाली आहे व त्याच्याविरुध्द खटला चालू आहे. मात्र त्याला बळीचा बकरा करून वरचे सर्व जण सुटू पाहणार असतील तर ते चालणार नाही. आणि या वरच्या सर्वांमध्ये थेट पंतप्रधानांपासून ते मुख्यमंत्री आणि नौदलाचे अधिकारीही येतात. चौकशी समितीने ही गोष्ट सांगितलेली नाही. मात्र तिचे जे निष्कर्ष आहेत त्यावरून हे पुढचे निष्कर्ष काढता येतात. पुतळा २६ ऑगस्ट रोजी पडला. त्यानंतर अवघ्या एका महिन्यांच्या आत समितीने आपला अहवाल दिला हे विशेष कौतुकास्पद आहे. समितीत नौदल व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि आयआयटीचे तज्ज्ञ होते. त्यांच्या मते पुतळ्याचा आराखडा किंवा डिझाईन सदोष होते. इतका मोठा पुतळा अर्थातच सलग नव्हता. त्यात वेगवेगळे तुकडे होते. पण या तुकड्यांचे वेल्डिंग चुकीच्या रीतीने करण्यात आले होते. शिवाय त्याची देखभालच न झाल्याने ठिकठिकाणी त्याला गंज आला व तो खराब झाला. पुतळा अगदी समुद्राच्या किनाऱ्यावर होता. सतत खारे वारे तेथे वाहत असतात. यामुळे घरातल्या वस्तूंना कशी गंज येते हे कोणाही कोकणी माणसाला ठाऊक आहे. या स्थितीत पुतळ्याबाबत विशेष काळजी घ्यायला हवी होती. पण ती अजिबात घेतलेली दिसत नाही. आता चौकशी समितीच्या सूचनांनुसार दोषींवर कारवाई होईल असे उद्योगमंत्री उदय सामंत यांनी म्हटले आहे. पण समितीने तर कोणाचीही नावे घेतलेली नाहीत. म्हणजे, ती ठरवण्यासाठी आणखी एक समिती नेमण्याची आणि वेळकाढूपणा करण्याची संधी सरकारला मिळणार आहे.

### कंत्राट कसे मिळाले?

ही संधी शिंदे सरकार अजिबात दवडणार नाही. निवडणुकीपर्यंत वेळ काढला जाईल. शिवाय शिल्पकार आपटेचा खटला न्यायालयात प्रलंबित आहे असे कारण सांगितले जाईल. सारांश आता पुतळा प्रकरणात आणखी कोणावरही कारवाई होण्याची शक्यता शून्य आहे. सरकारी काम जेव्हा कंत्राटाने दिले जाते तेव्हा ते योग्य रीतीने केले जात आहे की नाही याची तपासणी अधिकाऱ्यांनी करायची असते. रस्ते, पूल किंवा इमारती जेव्हा ठेकेदार बांधतो तेव्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंते वेळोवेळी त्यावर लक्ष ठेवून असतात. शिवाय अखेरीला तो काम नीट झाले असल्याचे प्रमाणपत्रही त्यांना द्यावे लागते. म्हणजे ही ठेकेदाराइतकीच त्यांचीही जबाबदारी असते. शिल्पकार आपटे याच्या पुतळ्याच्या कंत्राटाबाबतही हे सर्व होणे अपेक्षित होते. पण ते अजिबात झालेले नाही. आपटेने पुतळ्याचे उद्घाटन झाल्यावर त्याच्या तंत्रज्ञानाबाबत बरीच शेखी मिरवली होती. थ्रीडी प्रिंट्स काढून पहिला नमुना पुतळा कसा झटपट करण्यात आला याचे वर्णन त्याने केले होते. पण ती सर्व बंडलबाजी होती. मुळात आपण तोवर दीड दोन फुटांचेच पुतळे केले होते अशी कबुली खुद्द आपटेनेच दिली आहे. त्याला एकदम ३५ फुटांचे इतका महत्वाचा पुतळा कोणी व कसा दिला गेला हे या प्रकरणातले सर्वात मोठे गूढ आहे. पण ते बाहेर येऊ नये याचा कडेकोट बंदोबस्त झालेला दिसतो. मालवणमध्ये सध्या चालू असलेल्या खटल्याच्या बातम्याही कमीत कमी येतील असे पाहिले जात आहे. पुतळ्याचा मूळ प्रकल्प नौदलाचा असला तरी त्याची अंमलबजावणी शिंदे-फडणवीसांच्या सरकारने केली. आपटे हा ठाण्यातला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ परिवाराशी जवळचा इसम आहे. त्यामुळे त्याची शिफारस शिंदे शिवसेना किंवा भाजप यांच्या गोटातूनच झाली असावी असा संशय आहे. थेट पंतप्रधान ज्याचे उद्घाटन करणार आहेत असा पुतळा असल्याने दिल्लीचेही काही कनेक्शन असू शकेल. पण आजतागायत ते उघड झालेले नाही.

### भ्रष्टाचाराबाबत मौन

पुतळा पडल्यावर मुख्यमंत्री शिंदे यांची पहिली प्रतिक्रिया भयानक म्हणावी अशी होती. ताशी ४५ किलोमीटर वेगाच्या वाऱ्यामुळे पुतळा पडला असावा असे ते म्हणाले. हे विधान एकतर बेफिकीरीतून आले होते किंवा शिल्पकाराचा सर्व भ्रष्टाचार लपवण्यासाठी होते, असेच म्हणावे लागेल. आता सरकारी समितीने जे निष्कर्ष काढले आहेत त्यावरून पुतळा उभारताना मोठा भ्रष्टाचार झाला हे स्पष्ट आहे. शिंदे यांनी आता एक तर आपल्या पहिल्या उद्गारांबद्दल पुन्हा माफी मागायला हवी आणि या कंत्राटामागचे तपशील स्वतःहून जाहीर करायला हवेत. पण ते करणे, उघडच, गैरसोईचे आहे. महाविकास आघाडीतील माजी मंत्री व मुख्यमंत्री हे तपशील खणून काढू शकतात. कितीतरी वर्षे त्यांनी मंत्रालयात काम केलेले आहे. पण एक तर त्यांच्यात इच्छाशक्ती नाही किंवा ते हतबल आहेत. महायुतीने अधिकाऱ्यांवर इतकी दहशत बसवली आहे की याचा एकही तपशील बाहेर येऊ शकलेला नाही. पुतळा तयार होताना वा नंतर त्यावर कोणाचेच नियंत्रण नव्हते. नंतर त्याची देखभाल सार्वजनिक बांधकाम विभागाने करायला हवी होती. पण ती झाली नाही. त्यांनी त्याचे खापर नौदलावरच फोडले. शिंदे आणि मोदी सरकारमध्ये किती बजबजपुरी आहे हे यावरून स्पष्ट दिसते. याची जबाबदारी घेऊन शिंदे व फडणवीसांनी खरे तर राजीनामाच द्यायला हवा. पण ते हे करणार नाहीत. उलट आता पुन्हा त्याच जागी सहा महिन्यात नवीन पुतळा उभारण्याची घोषणा झाली आहे. हे कंत्राट वीस कोटींचे असेल. शिवाय या जागी शंभर कोटींची शिवसृष्टीही उभारली जाणार आहे. एकूण पुन्हा यात शेकडो कोटींची कंत्राटे निघणार व सत्ताधीशांच्या जवळच्यांचे भले होणार. लोक मूर्ख आहेत यावर शिंदे-फडणवीसांचा ठाम विश्वास आहे. पुतळा पडल्याची चौकशी करणाऱ्या समितीने उघडपणे न सांगितलेल्या गोष्टी जनतेनेच आता समजून घ्याव्यात आणि नेत्यांच्या मस्तीचा फैसला करावा.

विचार

# काश्मीरमध्ये जम्मूरियत!

***अटलबिहारी वाजयेपी यांनी जम्मू-काश्मीरसाठी जम्मूरियत, काश्मिरीयत आणि इन्सानियतची त्रिसूत्री दिली होती. तब्बल दहा वर्षांनंतर जम्मू-काश्मीरमध्ये झालेल्या पहिल्या दोन टप्प्यातील निवडणुकीत जम्मूरियत प्रत्ययाला आली. सत्ता मिळवण्यासाठी शह-काटशह, व्यूहनीती झाली असली, तरी काश्मीरमध्ये लोकशाही रुजली, रुळली असल्याचे जगाला दाखवून देण्यात भारत यशस्वी झाला आहे.***

**आरिफ शेख**



काश्मीरमध्ये दहा वर्षांपूर्वी 'पीडीपी' आणि भाजपचे सरकार सत्तेवर आले होते. भाजपने 'पीडीपी'चा पाठिंबा काढूनघेतल्यानंतर ते सरकार कोसळले. नंतर काश्मीरचा विशेष राज्याचा दर्जा काढून घेण्यात आला. या काळात फक्त लोकसभा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका झाल्या; परंतु जम्मू-काश्मीरमध्ये दहा वर्षांनंतर प्रथमच विधानसभेच्या निवडणुका झाल्या. दहा वर्षांपूर्वी झालेल्या त्या निवडणुकांच्या तुलनेत पहिल्या दोन टप्प्यांमध्ये जास्त मतदान झाले. वयोवृद्ध, तरुणांनी रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला. जम्मू-काश्मीरचे दोन प्रांतात विभाजन झाल्यानंतरची ही पहिलीच निवडणूक. लडाख प्रांत केंद्रशासित करण्यात आला आहे. जम्मू-काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा नाही, तसेच दिल्लीसारखे अनेक अधिकार काढून घेण्यात आले असले, तरी राजकीय पक्ष आणि मतदारांमध्ये उत्साह कायम होता. पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानानंतर आता राजकीय अंदाज बांधायला सुरुवात झाली असली, तरी तो या लेखाचा विषय नाही. अटलबिहारी वाजपेयी यांच्या तीन सिद्धांतांपैकी एका सिद्धांतावर काश्मीरची वाटचाल सुरू आहे, हे यानिमित्ताने सिद्ध झाले. काश्मीरमध्ये काँग्रेस आणि 'नॅशनल कॉन्फरन्स'ची युती आहे. 'पीडीपी', भाजप, 'पीपल्स कॉन्फरन्स' आदी पक्षही निवडणुकीच्या रिंगणात आहेत. गेल्या ३६ वर्षांपासून काश्मीरमधील मूळ गावापासून दूर वनवासात जगणारे विस्थापित काश्मिरी पंडित मातृभूमीत परतण्याचे स्वप्न पूर्ण होईल, या आशेने मतदान करत आहेत. आपली तरुण पिढी आपल्या मुळांशी जोडलेली रहावी, यासाठी पुनर्वसन व्हायला हवे अशी त्यांची अपेक्षा आहे. त्यामुळेच काश्मीरमध्ये जोशात मतदान प्रक्रिया पार पडत असून सरकार ही जबाबदारी पेलण्याकामी यशस्वी ठरले आहे.

पनुन काश्मीर आणि इतर संघटनांनी केलेल्या मतदानावरच्या बहिष्काराच्या आवाहनाचा फारसा परिणाम काश्मीरमध्ये झालेला नाही. येथिल ७० वर्षीय अवतार कृष्णा म्हणतात, 'काश्मीरमधील हक्काच्या मातृभूमीवर हक्क मिळावा हीच आमची मागणी आहे; ज्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे सातत्याने मतदान करत आहोत. या मागणीकडे दुर्लक्ष होत राहणे निराशाजनक आहे.' दोन दशकांपूर्वी जाहीर केलेली वापसी आणि पुनर्वसनाबाबतची सरकारी धोरणे कधीही प्रभावीपणे राबवली गेली नाहीत. दरम्यान, प्रत्येक लहान-मोठी निवडणूक गांभीर्याने घेत आपली सर्व ताकद पणाला लावणारा भाजप निवडणूक जिंकण्याची सर्वात मोठी यंत्रणा कामाला लावतो. अशा परिस्थितीमध्ये भाजपने या विधानसभा निवडणुकीत पूर्ण यंत्रणा उतरवली नाही, अशी चर्चा आहे. खोऱ्यातील २८ जागा भाजपने सोडल्या. याबाबत आता तर्क लढवले जात आहेत. भाजप गंभीर नाही की त्याची ही रणनीती असून खोऱ्यात काँग्रेस आणि 'नॅशनल कॉन्फरन्स'च्या विरोधातील मतविभागणी टाळून आपले इप्सित साध्य करण्याचा प्रयत्न आहे, हे लवकरच कळणार आहे.

जम्मू-काश्मीरकडे केंद्र सरकारचे विशेष लक्ष आहे. कलम ३७० हटवणे असो, जम्मू-काश्मीर राज्याची पुनर्रचना असो किंवा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर जम्मू-काश्मीरची प्रतिमा सुधारणे असो; मोदी सरकारने खूप मेहनत घेतली आहे; मात्र निवडणूक लढवण्याची वेळ आली, तेव्हा भाजपने ९० पैकी केवळ ६२ जागांवर उमेदवार उभे केले. खोऱ्यात कमी जागांवर निवडणूक लढवली. जम्मू विभागातील सर्व ४३ जागांवर भाजप निवडणूक लढवत असला, तरी खोऱ्यातील ४७ पैकी केवळ १९ जागांवरच निवडणूक लढवत आहे. खोऱ्यात २८ जागा रिकाम्या ठेवल्या आहेत. भाजपने काश्मिर खोऱ्यामध्ये उमेदवार न देण्याचे कारण काय? दोन मुद्दे तपासले असता या प्रश्नाचे उत्तर सापडते. पहिले म्हणजे भाजपचे राजकारण आणि दुसरे म्हणजे खोऱ्यातील लोकसंख्या. एका विशिष्ट धर्माचे राजकारण करत असल्याचा आरोप भाजपवर नेहमीच केला जातो, तर खोऱ्याची लोकसंख्या भाजपने तयार केलेल्या कथनापेक्षा पूर्णपणे वेगळी आहे. एका आकडेवारीनुसार, काश्मीर खोऱ्यातील सुमारे ९७ टक्के लोकसंख्या मुस्लिम आहे. जम्मू आणि काश्मीर दोन प्रदेशांमध्ये विभागले गेले आहे. भाजपला काश्मिर खोऱ्यात मते मिळणे फार कठीण आहे तर हिंदू, शीख आणि बौद्ध मिळून लोकसंख्या तीन टक्क्यांहून कमी आहे. अशा स्थितीत खोऱ्यात भाजपला मते मिळवणे अवघड आहे आणि हे पक्षाला चांगलेच ठाऊक आहे. त्यामुळेच नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीतही खोऱ्यातील तीन लोकसभा जागांपैकी एकाही जागेवर भाजपने उमेदवार उभा केला नाही.

जम्मूमध्ये भाजपने लोकसभेच्या दोन्ही जागांवर उमेदवार उभे केले. विजयही नोंदवला. त्यामुळे भाजपचे संपूर्ण लक्ष केवळ जम्मूवर आहे. जम्मू-काश्मीरमध्ये सत्ता मिळवण्यासाठी कोणत्याही पक्षाला ४६ जागांची आवश्यकता आहे. त्यामुळे भाजपने जम्मूवर आपले लक्ष केंद्रित केले आहे, तर खोऱ्यातून भाजप अपक्ष आणि 'पीडीपी'-'नॅशनल कॉन्फरन्स'च्या बंडखोरांचा पाठिंबा मिळवण्याची अपेक्षा आहे. अभियंता रशीद यांना भाजपची 'बी टीम' म्हटले जाते. फारुख अब्दुल्ला, मेहबूबा मुफ्ती हे वारंवार सांगत आहेत की भाजप त्यांच्या बंडखोरांना प्रोत्साहन देत आहे आणि भाजपला पुढचा मुख्यमंत्री जम्मूचा आणि हिंदू असावा असे वाटते. अनंतनागमधील भाजपचे उमेदवार रफिक वानी यांनी अभियंता रशीद, सज्जाद लोन, अल्ताफ बुखारी आणि गुलाम नबी आझाद यासारख्या नेत्यांना स्वतःचे म्हणून घोषित केले होते. अब्दुल्ला आणि मेहबूबा हे दोघेही इंजिनीअर रशीदच्या जामिनावर नाराज आहेत, कारण त्यांना मिळणारी मते 'नॅशनल कॉन्फरन्स'-काँग्रेसची किंवा 'पीडीपी'ची असतील. विजय असो वा पराजय; पक्षाने उमेदवार उभे केल्यासच खोऱ्यात जनाधार वाढेल, अशी भाजपच्या जुन्या कार्यकर्त्यांची इच्छा होती. कलम ३७० हटवल्यानंतर आणि जम्मू-काश्मीरमधील परिस्थिती बदलल्यानंतर भाजपला आपल्या जागा वाढण्याची अपेक्षा आहे, पण ती फक्त जम्मू भागात आहे. त्यामुळे जम्मूमध्ये ४३ पैकी ३२-३५ जागा मिळाल्या, तरी भाजपचा खोऱ्यातील अपक्षांच्या मदतीने सरकार स्थापन करण्याचा प्रयत्न असेल.

पहिल्या दोन टप्प्यांमधील मतदानाच्या टक्केवारीने जम्मू-काश्मीरमधील जनतेला या निवडणुकीत किती उत्सुकता आहे हे दिसून आले. तुरुंगातून सुटका होऊन 'जमात'शी युती केल्यामुळे अभियंता रशीद यांच्यावर भाजपचे 'प्रॉक्सी' समर्थक असल्याचा आरोप होत आहे. रशीद यांच्या पक्षाला निधी कुठून दिला जात आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. इंजिनीअर रशीद यांचा पक्ष आणि 'जमात-ए-इस्लामी'यांची युती ही प्रत्यक्षात काँग्रेस, 'नॅशनल कॉन्फरन्स' आणि 'पीडीपी' विरुद्धची आघाडी असून त्यांची व्होट बँक फोडण्याचा प्रयत्न असू शकतो. स्थापनेपासून 'पीडीपी'काश्मीरमध्ये फुटीरतावाद्यांच्या सहानुभूतीचे राजकारण करत आहे. रशीद आणि 'जमात'देखील त्याच स्वरात बोलतात. 'जमात-ए-इस्लामी' आणि रशीद यांचे विचार सारखेच आहेत. 'जमात-ए-इस्लामी'चे नेते १९८७ पासून सातत्याने निवडणुकीवर बहिष्कार घालत होते; मात्र या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत 'जमात'च्या अनेक नेत्यांनी मतदान करून लोकांना आश्चर्याचा धक्का दिला. 'जमात-ए-इस्लामी' ही धार्मिक-राजकीय संघटना आहे. या संघटनेचा काश्मीरमधील सोपोर, कुलगाम, शोपियान आणि पुलवामा येथे चांगला दबदबा आहे. काश्मीरच्या मुद्द्यावर भारत, पाकिस्तान आणि काश्मीरमधील जनतेने एकमेकांशी चर्चा करून तोडगा काढावा, असे 'जमात'चे म्हणणे आहे.

२०१९ मध्ये केंद्र सरकारने 'जमात-ए-इस्लामी'वर दहशतवादी निधी आणि देशविरोधी कारवायांमध्ये सहभागी असल्याच्या आरोपावरून पाच वर्षांसाठी बंदी घातली होती. गेल्या तीन वर्षांमध्ये सरकारने 'जमात'च्या अनेक मालमत्ता जप्त केल्या आहेत. या वर्षी फेब्रुवारीमध्ये पाच वर्षे पूर्ण झाल्यानंतर सरकारने 'जमात-ए-इस्लामी'वरील बंदी पुन्हा पाच वर्षांसाठी वाढवली. या काळात 'जमात'चे अनेक नेते आणि कार्यकर्ते नजरकैदेत आहेत. विधानसभा निवडणुकीपूर्वी 'जमात'ने आपल्या संघटनेवरील बंदी उठवावी, या अटीवर सरकारकडे निवडणुकीत भाग घेण्याची इच्छा व्यक्त केली होती; मात्र सरकारने बंदी उठवली नाही. या निर्बंधामुळे 'जमात-ए-इस्लामी'ला थेट निवडणूक लढवता आली नाही. त्यामुळे पक्षाने अपक्ष उमेदवारांना पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. 'जमात'च्या नेत्यांचा दावा आहे की २०१९ नंतर सरकारने त्यांच्या संघटनेवर आणि त्यांच्याशी संबंधित लोकांवर आपली पकड घट्ट केल्यामुळे पक्षाच्या समस्या वाढल्या. त्यामुळे ते लोकशाही पद्धतीने लढण्याचा प्रयत्न करत आहेत. वाद-विवाद, चर्चा काहीही असली, तरी या निवडणुकीच्या निमित्ताने लोकशाही प्रक्रियेला अप्रत्यक्ष बळकट करण्यासाठी सर्वांचा हातभार लागतो आहे, हे महत्त्वाचे.

आजकाल

# सोयाबीनला अपेक्षित भाव नाही

**सोमिनाथ घोळवे**

सोयाबीन या पिकाच्या काढणीला वेग आल्यामुळे ग्रामीण भागात मजुरांचा जास्त तुटवडा निर्माण झालेला पाहण्यास मिळतो. त्यात शेतमजूर रोजंदारीवर मजुरी करण्याऐवजी गुत्ते (ठोक्याने) घेवून काढणी कडे कल देत आहेत. अर्थात अंगावर काम घेऊन सोयाबीन काढणी करतात. अंगावर घेतले की श्रम जास्त करून जास्त हजेरी मिळते हे मात्र निश्चित. रोजंदारीने ३००/३५० रुपये रोज हजेरी मिळते. तर अंगावर घेतले तर ५०० ते ७५० रुपये हजेरी मिळते. सोयाबीन कढणीचे काम काही दिवसच मिळणार आहे हे मजुरांना माहीत आहे, त्यामुळे रात्रीचा दिवस करून काढणी करताना दिसून येतात.

एक एकर सोयाबीन काढण्यासाठी ४५०० ते ५५०० रुपये असा दर आहे. मुळात सोयाबीन या पिकास काळी जमीन असेल तर सरासरी ७ ते ८ क्विंटल तर तांबडी असेल तर ४ ते ५ क्विंटल उतार मिळतो. सद्यस्थिती सोयाबीनला भाव ४२०० ते ४३०० रुपये चालू आहे. यातील एक क्विंटल पेक्षा जास्त पैसे केवळ काढणीला जाऊ लागले आहेत.

मशीनने सोयाबीन काढणीस देखील ५५०० रुपये एकरला घेतात. जर जमिनीत चिकल नसेल तरच मशीन येते. त्यातही मशीनने सोयाबेन काढले तर जमिनीचा तुडवा जास्त होतो. रब्बीला शेतीच्या मशागतीचा खर्च वाढणार. शिवाय सोयाबीन ची २० टक्के जवळपास घळती (नासाडी) केवळ काढणी मध्ये होत आहे. अर्थात मशिन ने काढले की काधानीचे पैसे द्या आणि वरून २० टक्के सोयाबीन उत्पादन कमी. गळती झालेले सोयाबीन आपोआप रब्बीला उघवते. ते गावात म्हणून काढणीचा खर्च वाढतो. यामुळे शेतकऱ्यांचा कल मजुरांकडून सोयाबेन काढणीकडे आहे.

एकंदर घरच्या घरी सोयाबीन काढले नाही आणि मजुरांकडून किंवा मशीनने सोयाबीन काढायचे म्हटले तर एक क्विंटल सोयाबीनची किंमत मोजावी लागते हे मात्र निश्चित. सोयाबीन काढणीला मिळणारे पैसे मजूर किंवा मशीनचा मालक यांच्या नजरेतून कमीच आहेत. मात्र शेतकऱ्यांना जास्त पैसे मोजावे लागतात असे वाटते. मजुरांच्या बाबतीत जास्त तक्रारी असतात, मात्र मजूर वाढीव किंवा श्रमाला योग्य मोबदला मागतात, त्यात मजुरांना दोष देता येत नाही. त्यांना त्याचे श्रम विकण्याचे आणि श्रमाला योग्य मोबदला मिळवण्याचा अधिकार आहे. शिवाय किती श्रम विकायचे हा देखील अधिकार आहे.

मुळात सोयाबीन हे शेतमाल नगदी/ व्यापारी पीक असेल तरीही त्याचा बाजार भाव काय हा मुद्दा महत्त्वाचा आहे. सोयाबीनचे बाजार भाव हे ६ हजार रुपयांपेक्षा पेक्षा जास्त प्रती क्विंटल असणे गरजेचे होते. ते नाही हे प्रथम लक्षात घेणे गरजेचे आहे. जर ६ हजारापेक्षा जास्त भाव असेल तरच परवडते. मात्र हा भाव का मिळत नाही हा प्रश्न अनेकजण उपस्थित करतात. बाजार भाव हा आवक - जावकवर ( बाजार व्यवस्थेवर) आधारित आहे असे अनेकजण म्हणतात. मात्र आवक - जावाक कोण वाढवते, कोण कमी करते?. तर हे सर्व सरकारच्या धोरणांवर आवलंबुन आहे. सद्यस्थितीत सरकारने धोरणानुसार मोठ्या प्रमाणावर सोयाबीनची आयात केली आहे, त्यामुळे बाजार खरेदी करणारे कमी होतील अशी स्थिती आहे. या स्थितीत आवक वाढून भाव कोसळणार / घसरणार आहेत हे मात्र निश्चित. त्यामुळे सोयाबीनला भाव चांगला मिळून चार पैसे शेतकऱ्यांकडे येणे आवश्यक आहेत. जेणेकरून मजुरांकडून चार पैसे गेले तरीही त्यांना त्यांच्या श्रमाचे पैसे जात आहेत. यात वावगे काही नाही असे वाटायला हवे. मात्र सोयाबीन भाव पडल्याने सोयाबीन काढणीस पैसे जास्त जात आहेत असे वाटणे स्वाभाविक झाले आहे.

घरचे एक एकर क्षेत्रातील दफ्तरी सोयाबीन मळणी केली. ९.५० क्विंटल उतार आला. गेल्या दोन वर्षांपासून भाववाढ नसल्याने तत्काळ विक्री करण्याचा निर्णय घेतला. आम्हाला लातूर हेच बाजार मार्केट असल्याने, वाहतूक खर्च वाढतो. त्यामुळे स्थानिक व्यापाऱ्यांकडे विकले. ३९००/- रुपये प्रती क्विंटल भाव मिळाला.

यातून एक गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे सातत्याने गेल्या १५ ते २० दिवसांपासून सोयाबीनची भाववाढ चालू आहे अशा बातम्या येत आहेत. त्यात बाजार समित्यांच्या आवारात भाववाढ भाव समोर येत आहेत. त्यातही जास्तीत जास्त ४६०० रुपयांपर्यंत भाववाढ झाली आहे. मात्र हमीभाव जाहीर केला आहे, तेथपर्यंत भाववाढ पोहचलेली नाही. त्यात नवीन सोयाबीन बाजारात येऊ लागल्याने आवक वाढली आहे. परिणामी जे ४००/५०० रुपये दरवाढ झाली होती, त्यात घसरण होणे चालू आहे. मात्र १००/२०० रुपये भाववाढ झाली की मीडियाच्या माध्यमातून बोबाटा मोठा केला जातोय. ज्यावेळी सोयाबीनचे भावात घसरण होते, त्याची दखल घेतली जात नाही. एकंदर मीडिया हा सत्ताधारी आणि व्यापाऱ्यांच्या बाजूने आहे हेच पुढे येते. दुसरे, भाववाढ आभासी आहे. जमिनीवरील वास्तवात भाववाढ झालेली दिसून येत नाही. **(साभार)**

लोकसंसद

## बेरोजगारीचे भीषण वास्तव

भारत हा तरुणांचा देश आहे. जगातील सर्वाधिक तरुण भारतात आहे. देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ४० टक्के लोकसंख्या ही तरुणांची आहे. आज आपण याच तरुणांच्या जोरावर महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत. भारताचे माजी राष्ट्रपती, महान शास्त्रज्ञ डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. या तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे. तरुणांच्या या ऊर्जेचा योग्य वापर झाल्यास भारताला महासत्ता होण्यापासून कोणीही रोखू शकणार नाही असा ठाम विश्वास डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांना होता. डॉ ए पि जे अब्दुल कलाम यांच्यासारख्या द्रष्ट्या व्यक्तीने जे ओळखले ते आजच्या राज्यकर्त्यांना मात्र ओळखता आले नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागेल कारण आजच्या तरुणांच्या ऊर्जेचा, त्यांच्या गुणवत्तेचा उपयोग सरकारला करून घेता येता नाही किंवा सरकार जाणीवपूर्वक त्याकडे दुर्लक्ष करत आहे याचा पुरावाच स्टेट ऑफ वर्किंग इंडिया २०२३ च्या अहवालातून पाहायला मिळतो. या अहवालातून देशातील बेरोजगारीच्या समस्येचे भीषण वास्तव समोर आणले आहे. या अहवालानुसार देशात तरुण पदवीधर बेरोजगाराईचा दर ४२.३ टक्क्यांच्या उच्च स्तरावर आहे, तर कमी शिकलेल्या लोकांच्या बेरोजगारीचा दर ८ टक्के आहे. २५ ते ३० वर्ष वयोगटातील पदवीधर किंवा उच्च पात्रता धारक तरुणांचा बेरोजगरीचा दर २२.८ आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील पात्रता असलेल्या आणि २५ वर्षापेक्षा कमी वयोगटातील तरुणांमध्ये बेरोजगारीचा दर २१.४ टक्के इतका आहे. याचाच अर्थ कमी शिकलेल्या पासून पदवीधर असलेल्या तरुणांपर्यंत सर्वांनाच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत आहे. ही आकडेवारी चिंताजनक आहे. देशातील ४० टक्क्यांहून अधिक तरुण जर बेरोजगार असतील तर त्या तरुणांच्या मानसिकता काय असेल याचा विचार न केलेलाच बरा. शिक्षण आहे, पदवी आहे, काम करण्याची उर्मी आहे, कुटुंबासाठी, देशासाठी काही तरी करुन दाखवण्याची इच्छा आहे मात्र नोकरी नाही अशी अवस्था तरुणांची आहे. नोकरी नसल्याने तरुणांमध्ये प्रचंड नैराश्य आले आहे. आपण इतके शिकूनही आपल्या शिक्षणाचा उपयोग होत नाही त्यामुळे तरुण प्रचंड अस्वस्थ आहेत. शासन रोज नवे परिपत्रक काढून तरुणांचा रोजगार हिरावून घेत आहे. या अस्वस्थतेचा उद्रेक केंव्हाही होऊ शकतो. जर तरुणांच्या अस्वस्थतेचा उद्रेक झाला तर भल्या भल्यांना पळता भुई थोडी होईल म्हणूनच सरकारने तरुणांच्या हाती रोजगार द्यावा. त्यांच्यात असलेल्या ऊर्जेचा राष्ट्रकार्यासाठी उपयोग करून घ्यावा. देशातील बेरोजगारी कमी करण्यासाठी सरकारने ठोस प्रयत्न करावेत.

**- श्याम ठाणेदार, पुणे**

मराठी साहित्यिक दिनविशेष

**३० सप्टेंबर**

**१८९३ :-** कथाकार, नाटककार, नाट्यसमीक्षक वासुदेव वामन भोळे यांचा जन्म. त्यांचे 'सरलादेवी' हे नाटक नव्या नाटयप्रवाहाचे निदर्शक म्हणून गाजले. इब्सेनच्या नाटयतंत्राची मांडणी या नाटकाद्वारे प्रथमच रंगभूमीवर केली होती. 'समीक्षागौरव' हा नाट्यविषयक समीक्षा लेखांचा संग्रह प्रकाशित. **१९१२:-** अभिनेत्री आणि 'चंदेरी दुनियेत' या आत्मवृत्ताची लेखिका लीला चिटणीस यांचा जन्म. **१९१३ :-** कथालेखक ललित गद्यलेखक मोरेश्वर शंकर भडभडे यांचा जन्म. 'संध्याकाळच्या सावल्या', 'शांती', 'संधिप्रकाश', 'पुष्करणी', 'गुलमोहर' असे कथासंग्रह प्रकाशित. **१९३१ :-** कवी नारायण वामन कुलकर्णी यांचा जन्म. हे माझ्या गवताच्या पात्या', 'मागील पानावरुन पुढे सुरु' आदी काव्यसंग्रह प्रसिध्द. **१९३२ : -** प्रा. डॉ. पीतांबरी चिमणराव सरोदे यांचा जन्म. राष्ट्रभाषा पंडीत असणाऱ्या डॉक्टरांनी तीसहून अधिक पुस्तके लिहिलीत. **१९४० : -** कवी अनियतकालिकांचे संपादक राजा ढाले यांचा जन्म. स्फुट लेखांचा संग्रह 'अस्तित्वाच्या रेषा' आणि 'स्थितीच्या कविता' हा लहानसा संग्रह असे मोजकेच लेखन करणारे ढाले हे १९६० नंतरच्या अनियतकालिकांना दिशा दाखवणारे ठरले. **१९४९ :-** कवी तुलसी परब यांचा जन्म. 'हिल्लोळ', 'धादान्त, सुप्रमेय्यमधल्या कविता', 'कुबडा नार्लियस' ह्या काव्यसंग्रहासह या ब्लो नेसराच्या कवितांची भाषांतरे हा अनुवादीत काव्यसंग्रह प्रसिध्द त्यांच्या कविता गद्यप्राय शैलीतील असून प्राधान्याने विचारप्रधान आहेत. **१९४२ :-** समाजशास्त्रीय विचारवंत, ग्रंथकार भास्कर लक्ष्मण भोळे यांचा जन्म. 'दुसरे स्वातंत्र्य', 'राजकीय भारत', 'शिक्षण आणि संस्कृती', 'नवी घटनादुरुस्ती', 'जोतिराव फुले', 'वारसा आणि वसा', 'डॉ. आंबेडकरांचा वैचारिक वारसा इत्यादी पुस्तकातून त्यांच्या वैचारिक कक्षेची व सामाजिक व वैचारिक भूमिकेची कल्पना येते. नवहिंदुत्वाची व्याघ्रमुद्रा, जातीपातीचे राजकारण अशी पुस्तके आणि अनुवादीत साहित्य त्यांच्या नावावर आहे. **१९६१ : -** कवयित्री जयवंता घनश्याम कापगते यांचा जन्म. डोहाळगाणी आणि पाळणे' हा लोकगीत संग्रह त्यांचा प्रकाशित झाला आहे. त्यात हिंदी पुस्तकांची संख्या लक्षणीय आहे. 'मुलांसाठी', 'मातृत्वाची साधना', 'महात्मा गांधी विचार', 'ग्रंथाची किमया', 'साने गुरुजींची साहित्य साधना' या महत्त्वपूर्ण पुस्तकांसह 'सच्चा दोस्त', 'टॉलस्टॉय से पत्रसंवाद', 'एक अनिकेत', 'बालवाणी' हे संपादन. 'सर्जता' हा साहित्यिक निबंध तसेच राममोहन **१९६३ :-** साहित्यिक सायमन जोसेफ मार्टिन यांचा जन्म. त्यांच्या साहित्यसंपदेत 'कालवारी', दुःखसहनाच्या वाटेवर', 'बकऱ्या', 'तांबड्या समुद्राच्या किनाऱ्या वर हल्लाबोल', 'कन्फेशन' हे काव्यसंग्रह तसेच 'क्रुसाचे वाटेकरी' हे वैचारिक आणि 'प्रार्थनामृत' हे दोन हजार वर्षातील सर्वोत्कृष्ट प्रार्थनांचा संग्रह व 'देवांशी संवाद' हे ललित अशी साहित्यसंपदा. **१९६७ : -** 'सर्वहारा विश्व उत्तरपत्रिका' ह्या मासिकाच्या संपादक, पत्रकार, स्तंभलेखिका डॉ. नयना धवड (देवधर) यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'ओएसिस' (ललित बंध) आणि वर्तमान व्यवस्था' हा वैचारिक लेखसंग्रह प्रसिध्द. **१९९७ :-** कथा-कादंबरीकार भगवंत दिनकर गांगल यांचे निधन. 'क्षणचित्रे', 'शल्ये' ह्या का संग्रहासह 'आसवांची माळ', 'पिंजऱ्यातील पक्षी', 'पाझर', 'रंगाचे घर' या कादंबऱ्या त्यांच्या प्रकाशित. त्यांच्या लेखनातून अनुभवलेले जीवन, त्यातून दिसणारे मनुष्य स्वभावाचे विविध नमुने यांचे चित्रण.

**- संजय वझरेकर**
**९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

३० सप्टेंबर

१) श्रीम. सुनिता मधुसूदन नाईक
अलिबाग, ३०-०९-१९३८
२) श्री. शरद शंकर बोभाटे
अलिबाग, ३०-०९-१९५०
३) श्रीम. आयरीन एझेक आवासकर
अलिबाग, ३०-०९-१९५२
४) श्री. सुभाष हरिभाऊ शेडगे
अलिबाग, ३०-०९-१९५७

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

### आजचे अन्नदाते




**श्रीमती विभा दातार, स्मृतिप्रीत्यर्थ, अलिबाग**



**कै. अनंत तुकाराम हासपाटील, स्मरणार्थ, बोर्ली - मुरुड**



**स्व. प्रभाकर मुकुंद बारटक्के, स्मृतिप्रीत्यर्थ, अलिबाग**



**स्व. कांतीलाल दामजी नागडा, स्मरणार्थ, विद्यानगर, अलिबाग**

# आंबेवाडी नाक्यावर मोकाट जनावरांचा ठिय्या

## ■ विभागीय पोलीस निरीक्षकांकडे गाऱ्हाणे

**। कोलाड । वार्ताहर ।**
**मुंबई-गोवा महामार्गावरील कोलाड आंबेवाडी नाक्यावर गेली अनेक वर्ष मोकाट जनावरांचे कळप रस्त्यावर थांड मांडून बसलेले असतात. यामुळे काही जनावरे आपघाताला सामोरे जातात तर काही जनवरांच्यामुळे आपघात घडून वाहन चालक व प्रवासी जखमी होत असतात. यामुळे गेली अनेक दिवस येथील ग्रामस्थ या समस्येबाबत आक्रमक झाले होते.**

दिवसेंदिवस मोकाट गुरांच्यात होत असलेली वाढ, याचबरोबर वाढते आपघात तसेच ही गुरे रात्री-अपरात्री कुठेही उभी असतात. यामुळे काही गुरे अवजड वाहनांच्या धडकेने अपघात होऊन जखमी होतात तर काही जागीच मृत्यू पावत असल्याच्या घटना घडत आहेत. काहीवेळा दुचाकीस्वार यांना धडक बसल्याने ते देखिल जखमी होत आहेत. या मोकाट गुरांचे मालक कोण आहेत, याचा थानपत्ता नाही. परंतु, यातच मार्गाचे रुंदीकणाचे काम सुरू असून यात राष्ट्रीय महामार्ग म्हणून वाहतुकीचे प्रमाण देखिल अधिक असल्याने यावर उपाय योजना करण्यात यावी, अशी मागणी यावेळी कोलाड पोलीस प्रशासनाकडे करण्यात आलेली आहे. या गोष्टीचा पाठपुरावा म्हणून कोलाड आंबेवाडी नाक्यावरील ग्रामस्थ तसेच विविध सामजिक संघटना पत्रकार यांनी शनिवारी (दि.२८) विभागीय पोलीस निरीक्षक नितीन मोहिते यांची भेट घेऊन साऱ्या समस्यांचे गाऱ्हाणे मांडत यावर उपाय योजना करण्यात यावी, अशी मागणी केली.

यावेळी शिवसेना उबाठा गटाचे रोहा तालुका उपप्रमुख चंद्रकांत लोखंडे, प्रफुल बेटकर, विष्णू महाबळे, विजय शिंदे, महेश जंगम, श्याम लोखंडे, विश्वास निकम, तेजपाल जैन, परदेशीसह कोलाड आंबेवाडी ग्रामस्थ, विविध संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार उपस्थित होते.



> **कोलाड आंबेवाडी नाका तसेच परीसरात मोकाट गुरांच्या संख्येत भयानक वाढ झाली आहे. यामुळे ही गुरे-ढोरे रस्त्यावर येऊन आपघाताला कारणीभूत ठरत आहेत. तर, दुसरीकडे आपघात देखील घडत आहेत. तसेच, त्यांचे मालक कोण आहेत, ती कोणत्या गावातील आहेत याचा पत्ता नाही. मात्र, दुर्देवाने त्यांचा अंत झाला तर मनाला खूप वेदना होत असल्याने त्यांना नजीकच्या गो शाळेत अथवा त्यांचे मालक शोधून त्यांच्या ताब्यात देणे.**
> **- चंद्रकांत लोखंडे, सामाजिक कार्यकर्ते**

> **कोलाड आंबेवाडी ग्रामस्थ तसेच या परिसरातील विविध संघटना, पत्रकार यांनी मुंबई-गोवा महामार्गावर विशेषतः कोलाड आंबेवाडी नाक्यावर मुख्य चौक व परिसरात मोकाट गुरांचा कळप थांड मांडून बसलेले असतात. तसेच, मुख्य मार्गावर आल्याने आपघातास कारणीभूत ठरत आहेत. अधिक आपघात समस्येत वाढ होऊ नये यासाठी प्रशासनाच्या माध्यमातून यावर उपाय योजना करण्याची मागणी केली आहे. तसेच, गाव स्तरांवर बैठका घेऊन मालकांचा शोध घेऊन काही दिवसांत यावर तोडगा काढू.**
> **- पोलिस निरीक्षक नितीन मोहिते**



# पेज नदीवर नवीन पुलाची निर्मिती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**
कर्जत तालुक्यातील कडाव ते अंजप गावे जोडणाऱ्या रस्त्यावरील पेज नदीवर अगदी कमी उंचीचा पूल होता. पावसाळ्यातील चारही महिने या पुलावरून पाणी वाहत असल्याने या रस्त्याने वाहतूक करणे कठीण होत होते. स्थानिक रहिवाशी आणि शेतकऱ्यांची ही अडचण लक्षात घेऊन प्रशासनाकडून या जुन्या पुलाच्या ठिकाणी नवीन पुलाची निर्मिती करण्यात आलेली आहे.

पेज नदी बारमाही वाहणारी नदी असून उन्हाळ्यात देखील टाटा पॉवर हाऊसपासून दुथडी भरून वाहत असते. पावसाळ्यात तर आजुबाजुंच्या लहान ओढ्यांचे पाणि पेज नदीतून वाहत असल्याने पावसाळ्यातील चारही महिने दुथडी भरून वाहत असते. पुढे ही नदी उल्हास नदीला जाऊन मिळते. या नदीवरील अंजप येथे एक पूल असून त्या पुलाची उंची अत्यंत कमी होती. पावसाळ्यात या कमी उंचीच्या पुलावरून पाणी जायचे आणि या भागातील शेतकऱ्यांची पुलावरून जाण्यासाठी मोठी गैरसोय होत होती. यामुळे स्थानिकांनी या ठिकाणी नवीन पुल बांधण्यात यावा, अशी मागणी प्रशासनाकडे केली होती. याची दखल घेत प्रशासनाने जुन्या पुलाच्या ठिकाणी जास्त उंचीचा पुल बांधला असून या पुलावरून वाहतूक देखील सुरु करण्यात आली आहे.

# आगरदांडा येथे राष्ट्रीय पोषण महिना कार्यक्रम

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**
मुरुड-राजपुरी ग्रामपंचायत मधील डोंगरी गावातील रायगड जिल्हा परिषद मराठी शाळेत अदानी फाउंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड आणि एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माध्यमातून राष्ट्रीय पोषण महिना कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यावेळी एकात्मिक बाल विकास सेवा योजनाचे विस्तार अधिकारी संजय शेडगे, उपसरपंच इस्माईल सिद्दीकी, हेमंत नाईक, शुभांगी नरमोड, अदानी फाउंडेशनच्या डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे, अवधूत पाटील, प्राजक्ता आडूळकर, आदिती नाईक, विजयता खेऊर, मदतनीस आणि महिला उपस्थित होत्या.




जयश्री काळे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना पोषणाचे महत्त्व पटवून देत दैनंदिन जीवनात कुटुंबाचे आरोग्य अबाधित राखण्यासाठी महिलेची भूमिका आणि चौकस आहाराचे महत्त्व पटवून दिले. आपले जेवणाचे ताट नेहमी कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्व आणि प्रथिनांची गरज भागवणारे असायला पाहिजे. कोकणात विविध रानभाज्या मुबलक प्रमाणात आढळून येतात आणि ग्रामीण कुटुंब त्याचे पुरेपूर सेवन करतांना आढळतात. तसेच, भरड धान्य आणि कडधान्याचे महत्व पटवून देण्यासाठी अदानी फाउंडेशन प्रयत्नशील आहे, असे मत जयश्री काळे यांनी केले.

इस्माईल सिद्दीकी यांनी आपले मनोगत व्यक्त करत महिला व बालकांसाठी घेण्यात येणाऱ्या उपक्रमाबद्दल अदानी फाऊंडेशनचे आभार मानले. तसेच, यावेळी डोंगरी गावातील महिलांसाठी पौष्टिक आहार स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

# जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना अटक

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
हरी ओम मंगल कार्यालय (लता टॉकीज) गाडीतळ येथील एका वयोवृध्द महिलेला दुखापत करुन तिच्या हातामधील दोन सोन्याच्या बांगड्या व गळ्यामधील सोन्याची चैन जबरदस्तीने खेचून जबरी चोरी केल्याची घटना शनीवारी (दि.२८) घडली होती. याबाबत रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून संबंधीत आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या तपास पथकाने गोपनीय बातमीदाराद्वारे मिळालेल्या माहीतीवरुन हा गुन्हा शेखर रमेश तळवडेकर याने त्याची पत्नी आश्लेषा शेखर तळवडेकर हीच्या मदतीने केलेला असल्याचे निष्पन्न झाले होते. गोपनीय माहितीच्या आधारे संशयीत आरोपी शेखर तळवडेकर (४८) व आश्लेषा तळवडेकर (४७) यांना २४ तासांच्या आत ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून गुन्ह्यात जबरी चोरी केलेले एकूण १ लाख ६४ हजार रुपये किमंतीचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

# एसटीला दुचाकीची धडक

**रत्नागिरी :** संतोष माने (३९) हा मंगळवारी (दि.२४) रात्रीच्या सुमारास दुचाकी (एमएच-०८-बीएफ-०७९८) घेवून कुवारबाव येथून जात होता. यावेळी राजापूर-रत्नागिरी बस (एमएच-२०-बीएल-२११७) ही रत्नागिरीच्या दिशेने येत असताना कुवारबाव येथे दुचाकीने समोरुन जोराची धडक दिली. यात दुचाकीचालक संतोष माने याला दुखापत झाली. तसेच, बसच्या समोरील भागाचेही नुकसान झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी निष्काळजीपणे वाहन चालवल्याचा ठपका ठेवत गुन्हा दाखल केला आहे.

# तरूणीची छेड काढणारे पोलीस निलंबित

**। सिंधुदुर्ग । प्रतिनिधी ।**
गोव्याला सहलीसाठी निघालेल्या पोलिसांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील एका तरुणीला अडवून तिची छेड काढत तिचे अपहरण करण्याचा प्रयत्न केला होता. ही घटना मंगळवारी (दि.२४) देवगड तालुक्यातील जामसंडे येथे ही घडली होती. याप्रकरणी देवगड पोलिसांनी सहाही आरोपींना अटक केली आहे. शुक्रवारी (दि.२७) मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयाचे पोलीस उपायुक्त सुहास बावचे यांनी विनयभंग करणारे पोलीस शिपाई हरिराम गीते आणि प्रवीण रानडे या दोघांना सेवेतून निलंबित केले आहे.




सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील जामसंडे गावातील आनंदवाडी वळणावर एक १८ वर्षीय महाविद्यालयीन तरुणी घरी जात होती. ती एकटी असल्याचे पाहून या पोलिसांनी तिची छेड काढली. पोलीस शिपाई हरिराम गीते याने 'माझ्या सोबत येते का? तुला वसई फिरवतो, असे सांगितले. वाहनातील अन्य पोलिसांनीही या तरुणीची टिंगलटवाळी काढून तिची छेड काढली. ती दुर्लक्ष करून जात असताना त्याने तिचा हात ओढून तिला गाडीत टाकून पळवून नेण्याचा प्रयत्न केला, हा प्रकार समजताच आसपासचे ग्रामस्थ गोळा झाले. त्यांनी या आरोपींना चोप दिला आणि देवगड पोलिसांच्या ताब्यात दिले. देवगड पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यांना अटक करण्यात आली. या आरोपींपैकी दोन वसई वाहतूक शाखेतील पोलीस, तर एक जण केंद्रीय औद्योगिक सुरक्षा बल (सीआयएसएफ) आणि एक जण राज्य राखीव पोलीस दलातील (एसआरपीएफ) दलात कार्यरत होते.

# 'महिलांना कायदेविषयक जागरूकतेची गरज'

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
पोषण आहाराबरोबरच महिलांना कायदेविषयक जागरूकतेची गरज आहे, असे प्रतिपादन चिपळूण येथील जिल्हा न्यायाधीश डॉ. अनिता नेवसे यांनी केले आहे. तालुका विधी सेवा समिती, जिल्हा न्यायालय १ चिपळूण व एकात्मिक बालविकास सेवा योजना, चिपळूण प्रकल्प १ यांच्या संयुक्त विद्यमाने कळंबस्ते ग्रामपंचायत येथे कायदेविषयक व राष्ट्रीय पोषण आहारविषयक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या.

पुढे बोलताना डॉ. नेवसे म्हणाल्या की, दिवसेंदिवस महिलांच्या वाढत्या समस्या व प्रगल्भ कायद्यामुळे प्रत्येक महिलेला तिच्या न्याय मागण्यांसाठी कायदेविषयक अधिकारांची जाणीव करून घेणे आवश्यक आहे. 'न्याय सर्वांसाठी' हे विधी सेवा प्राधिकरणाचे घोषवाक्य आहे. भारतीय संविधानानुसार सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजकीय न्याय मिळण्याचे अधिकार प्राप्त होत असतात. राज्य घटनेच्या आर्टिकल १४ अनुसार सर्व नागरिकांना समान संधी दिली आहे. न्यायालयीन पक्रियेमध्ये न्याय मागण्यांसाठी सर्वांना समान संधी प्राप्त करून देणे जेणेकरून समाजातील कोणतीही व्यक्ती किंवा घटक न्यायापासून वंचित रहाणार नाही हे या कायदेविषयक कार्यक्रमाचे उद्दिष्ट असल्याचेही डॉ. नेवसे म्हणाल्या.

# महिला शेतकऱ्यांचे कौशल्य प्रशिक्षण





**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**
जेएनपीएच्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी अंतर्गत सामाजिक संस्था सस्टेनेबल ॲक्शन टुवर्ड ह्युमन एम्पॉवरमेंट (साथी) यांच्या मार्फत जेएनपीए सक्षम प्रकल्प राबवित आहे. या प्रकल्पता महिला शेतकऱ्यांना त्यांची अंगीभूत कौशल्ये आणि क्षमता सुधारण्यासाठी व्यावसायिक प्रशिक्षण दिले जात आहे. म्हसळा तालुक्यातील काळसूरी आणि साळविंडे येथे कृषी आधारित उत्पादनांची प्रक्रिया, क्लस्टर निर्मिती आणि विपणन व्यवस्था यासाठी हा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविला जात आहे.

यावेळी साथी सामाजिक संस्थेचे संचालक सौरभ कुमार यांनी महाराष्ट्रातील गरीब स्त्रिया फळे, कडधान्ये आणि तृणधान्ये यांसारखी कृषी आधारित उत्पादने गोळा करून आपला उदरनिर्वाह करतात. तंत्रज्ञानाचे अपुरे ज्ञान, शेतीमालास बाजारपेठ उपलब्ध नसणे, मार्केटिंग यंत्रणा अपुरी, अकार्यक्षम असणे आणि यामध्ये शेतकऱ्याचे अधिकाधिक शोषक करण्याकडे कल असतो. या स्वरूपामुळे गरीब महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे, अशी माहिती देताना जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरण आणि साथी या सामाजिक संस्थेने हे काम सुरू केले आहे. याअंतर्गत २०० बहुजन म्हणजेच एससी, एसटी, ओबीसी, आर्थिकदृष्टया दुर्बल घटक व समाजातील महिला शेतकऱ्यांना व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे.

## पावस, नाचणे येथे प्रायोगिक तत्त्वावर प्रकल्प सुरू

# कोकणात कांदळवन पर्यटन क्षेत्राची निर्मिती

**। रत्नागिरी । प्रतिनिधी ।**
कोकण किनारपट्टीलगत विस्तीर्ण कांदळवन पट्ट्याचे संरक्षण आणि संवर्धनासाठी पर्यटनाच्या नव्या संकल्पना प्रत्यक्ष कृतीत उतरविण्यासाठी कोकणातील १५ किनारी गावांमध्ये पर्यटन झोन विकसित करण्यात येणार आहेत. यापैकी रत्नागिरी तालुक्यातील पावस आणि नाचणे येथे हा प्रकल्प प्रायोगिक तत्त्वावर सुरूही करण्यात आला आहे. उर्वरित गावांतही या प्रकल्पाच्या कामांना वेग आला आहे. या गावातून पक्षी निरीक्षण, कांदळवन अभ्यास, कांदळवन नौका सफर आदींद्वारे पर्यटकांना आकर्षित करताना स्थानिकांना पर्यटनाद्वारे उपजीविकेचे साधन निर्माण करण्यात येणार आहे.

कांदळवन कक्ष, वन विभाग महाराष्ट्र राज्य व कांदळवन प्रतिष्ठान यांच्या सहाय्याने कांदळवन संरक्षण व उपजीविका निर्माण योजनेंतर्गत कोकणातील किनारी गावांमध्ये कांदळवन सहव्यवस्थापन समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या समितीतर्फे किनारी गावातील खाडीक्षेत्रात दुर्लक्षित असलेले कांदळवन पर्यटन झोन विकसित करण्यात येणार आहे. रत्नागिरी तालुक्यात नाचणे येथील काजळी आणि गौतमी नदीच्या खाडी क्षेत्रात हा प्रकल्प प्रायोगिक तत्वावर सुरू झाला आहे. या प्रकल्पाद्वारे पक्षी निरीक्षण, कांदळवन अभ्यास फेरी, कांदळवन नौका सफर याद्वारे कांदळवनाचे संरक्षण व संवर्धनाबाबत माहिती पर्यटकांना देण्यात येणार आहे. तसेच, कांदळनाच्या जाती प्रजाती, त्यांची उपयुक्तता याबाबत अभ्यास करणाऱ्या अभ्यासकांना या क्षेत्रात संशोधन करता करण्याचे व्यासपिठ उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.



कांदळवन निसर्ग पर्यटन अंतर्गत कांदळवन आणि सागरी जैवविविधता परिचय केंद्र असे अनेक उपक्रम येथे राबविण्यात येणार आहेत. कोकणातील पालघर जिल्ह्यातील चार गावे, रायगडातील चार, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पाच आणि रत्नागिरी जिल्ह्यातील दोन गांवाचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच, ठाणे जिल्हा, नवी मुंबई आणि मुंबईतही या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे.

> **राखीव कांदळवन क्षेत्र**
> **कोकण किनारपट्टीतील सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे आणि मुंबईतील अंधेरी, बोरिवली जिल्ह्यातील १,५७५ हेक्टर कांदळवन क्षेत्र राखीव क्षेत्र म्हणून घोषित केले होते. यामध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील ३७४.५ हेक्टर, रायगड ३९२, बोरिवलीतील १८२.९, अंधेरीतील ७० हेक्टर आणि ठाण्यातील ५५४.७ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. या क्षेत्राला राखीव क्षेत्राचा दर्जा देण्यासाठी प्रस्तावित करण्यात आले आहे. या क्षेत्रात पर्यटनाच्या माध्यमातून उपजीविकेची साधने निर्माण करताना कांदळवन पर्यटन क्षेत्राची निर्मिती करण्यात येणार आहे.**



# शिक्षण परिषद संपन्न

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**
पहुर येथील रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कुडली केंद्राची शिक्षण परिषद केंद्रप्रमुख उमेश महाडेश्वर यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. सुरुवातीला उमेश माळेश्वर त्याचप्रमाणे ज्येष्ठ शिक्षकांच्या हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. यानंतर कुंडली केंद्रातील उपस्थित सर्व शिक्षकांचे पहूर प्राथमिक शाळेतर्फे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी अविनाश पाटील यांनी प्रास्ताविक केले. तसेच, उमेश महाडेश्वर यांनी केंद्रातील उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन केले. या शिक्षण परिषदेत अविनाश जाधव, स्वाती मगर, आदेश राऊत, राजेंद्र भोर आदींनी विविध विषयांवर मार्गदर्शन केले. यावेळी कुडली केंद्रातील सर्व शिक्षक उपस्थित होते

# कर्जतमधील नागरी समस्या सुटणार

## शहर बचाव समितीकडून १५ दिवसांची मुदत




**। वेणगाव । वार्ताहर ।**

शहर बचाव समितीकडून शहरातील समस्यांबाबत चर्चेसाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील ३१ समस्यांबाबत कर्जत शहर बचाव समितीच्या माध्यमातून पालिकेला निवेदन देण्यात आले होते. या समस्यांबाबत पालिका प्रशासन व शहर बचाव समितीची संयुक्त बैठक घेण्यात आली.

नगरपरिषदेच्या सभागृहात या सामूहिक चर्चेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शेकडो नागरिकांसह नगरपरिषदेचे मुख्याधिकारी वैभव गारवे, कार्यालयीन अधीक्षक रवींद्र लाड, नगर अभियंता मनीष गायकवाड, पाणी विभाग अभियंता अभिमन्यू एलवांडे, आस्थापना अधिकारी अविनाश पवार, कर संकलन अधिकारी जयेश घरत, स्वागत विरंबोले आणि प्रत्येक विभागाचे प्रमुख कर्मचारी उपस्थित होते.

सामूहिक चर्चा सुरू झाली तेव्हा नागरिकांमध्ये नगरपरिषदेच्या कामकाजाबाबत प्रचंड असंतोष पाहायला मिळाला. नागरिक अधिकाऱ्यांवर समस्या आणि प्रश्नांचा भडिमार करताना दिसत होते. दरम्यान पालिकेत सर्व प्रश्नांवर पंधरा ते एक महिन्याच्या कालावधीत सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे यावेळी मान्य केले आहे.

पाणीपुरवठा प्रश्नी नागरिकांनी आवाज उठवल्यावर पाणी वितरणाची वेळ बदलण्याची कार्यवाही प्रायोगिक तत्त्वावर करू. अशुद्ध पाण्याचा प्रश्न पावसाळ्यात निर्माण होतो. नगर पालिका स्थापन होऊन ३० वर्ष झाली. पूर्वी जोडणी दिली असेल तर आम्ही कापून टाकतो. मात्र पालिकेने विशेष ठराव घेऊन पाणी दिले असेल तर आम्ही ती जोडणी कापू शकत नाही. फार्महाऊससाठी पाणी जोडणी तपासली जाईल. याच पाणीपुरवठ्याबाबत सर्व प्रश्न आठ दिवसात सोडविले जातील असे आश्वासन पालिकेने दिले. शहरातील कचऱ्याचा प्रश्नही यावेळी गाजला. धूर फवारणीबद्दल आठवड्याचा आराखडा पालखीने सांगितला. त्यात कार्यवाही होत नाही असे वाटत असेल तर तक्रारी करा आम्ही कारवाई करू,असे आश्वासन दिले.

रस्ते साफसफाईसाठी लाखो रुपयांची वाहन खरेदी केली आहे. उद्घाटन केले तेव्हा एक दिवस ती गाडी रस्त्यावर दिसली त्यानंतर ते वाहन साफसफाईसाठी रस्त्यावर कधी दिसलेच नसल्याची तक्रार मोहन ओसवाल यांनी केली. सुनील गोगटे यांनी बायोगॅस प्रकल्प बंद झाला असल्याने शहरातील स्ट्रीट लाईट बंद झाल्या असून विजेचा खर्च वाढला आहे. त्या ठिकाणी केलेला खर्च हा किमान २० वर्षासाठी झालेला असतो. मग तो प्रकल्प दहा वर्षात बाद का झाला. याचा अभ्यास पालिकेने करून देखभालदुरुस्ती करणाऱ्यावर कारवाई व्हावी. हा प्रकल्प जेमतेम चार वर्षात लगेच बंद पडला आहे. ग्रामदैवत थापाया मंदिरामध्ये गटाराचे पाणी जमा झाले आहे. कर्जत शहरात कुठेही नो हॅकर्स झोन नाहीत. भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याबाबत पालिकेने कारवाई केली नाही. कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले जात नाही, अशा प्रश्नांचा भडीमार यावेळी करण्यात आला.

कर्जत उल्हास नदी पात्रात नदी संवर्धनाच्या नावाखाली जे बांधकाम चालू आहे ते किती चुकीची आणि पूरपरिस्थितीसाठी भयानक असल्याचे माधव भडसावळे यांनी सांगितले. ते काम थांबवा.नदीपात्रात मोठ्या प्रमाणात भराव टाकल्याने नदीची रुंदी कमी होत आहे. त्यामुळे भविष्यात पूरपरिस्थिती उद्भवली तर मोठ्या प्रमाणात मनुष्य हानी होईल. यावेळी संकेत भासे यांनीदेखील सदर काम त्वरित थांबवा असे मुख्याधिकारी यांना सुचित केले.

राजेश लाड यांनी दहिवली गावात अनधिकृत टपऱ्या उभारल्या असून येथे मांसाहारची दुकाने सुरू आहेत. त्यामुळे आमच्या गावातील परिसर गलिच्छ झाला आहे. इथला सर्व कचरा नदीपात्रात टाकण्यात येतो. बायोगॅस प्रकल्प बंद झाला असल्याने तेथे होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट वेळेवर होत नसल्याची तक्रार केली.

अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या यासर्व प्रश्नांची थातुर-मातुर उत्तर देऊन वेळ मारण्याचा प्रयत्न केला. चर्चेअंती कर्जत शहर बचाव समितीचे प्रमुख ॲड. कैलास मोरे यांनी उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना सांगितले की, नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सामूहिक चर्चेसाठी सकारात्मकता दर्शविल्याने १४ ऑक्टोबरपर्यंत शहरातील नागरिकांच्या सर्व समस्या सोडविण्यासाठी मुदत दिली आहे.

# रेल्वे स्टेशनजवळ ई-रिक्षा स्टँडची मागणी



**। माथेरान। वार्ताहर ।**

ई-रिक्षा स्टँड हे रेल्वे स्टेशन पासून जवळपास दीडशे मीटर अंतरावर असल्याने खड्डेमय रस्त्यातून स्टँडपर्यंत जाताना खूपच त्रासदायक बनत असल्यामुळे हे ई-रिक्षाचे स्टँड रेल्वे स्टेशन गेटच्या बाहेरील जागेत घ्यावे अशी मागणी पर्यटकांमधून केली जात आहे.

राज्यात कुठेही गेल्यास प्रवासी वाहनांचे स्टँड हे रेल्वे स्टेशनच्या बाहेर जवळच असतात त्यामुळे प्रवाशांना सहजपणे आपल्या सामानाची नेआण तसेच वयोवृद्ध व्यक्ती किंवा लहान लहान मुलांना प्रवास करण्यासाठी सोयीचे बनते. मागील वर्षांपासून माथेरानमध्ये पर्यटकांना स्वस्त दरात सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने ई-रिक्षाची सेवा उपलब्ध झाली आहे. त्यामुळेच याठिकाणी पावसाळ्यात कधी नव्हे एवढी पर्यटकांची गर्दी पहावयास मिळत आहे.राज्यातील विविध भागातून पर्यटक इथे आवर्जून भेट देत आहेत यापूर्वी दस्तुरीपासून गावात येण्यासाठी वाहतुकीची खूपच खर्चिक बाब होती. परंतु ई-रिक्षा सुरू झाल्यामुळे अगदी कमी खर्चात माणसी ३५ रुपयांत अवघ्या पाच ते सहा मिनिटांत दस्तुरी पासून रेल्वे स्टेशनपर्यंतचे हे अडीच किलोमीटर अंतर पार केले जात आहे. सध्याचे ई-रिक्षा स्टँड हे मुख्य रस्त्यावरील अरुंद जागेत असून बाजूला वीज वितरण कंपनीचे बंद अवस्थेतील जुने धोकादायक लोखंडी पोल उभे आहेत ते वाऱ्याच्या वेगाने केव्हाही पडून जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे रेल्वे स्टेशनच्या बाहेरील बाजूस ऐसपैस जागा उपलब्ध असून त्याठिकाणी हे ई-रिक्षा स्टँड असावे अशी मागणी पर्यटक त्याचप्रमाणे वयोवृद्ध स्थानिक लोक करीत आहेत.

> **आम्ही मिनीट्रेनच्या सफरीचा आनंद घेण्यासाठी मुलांना घेऊन येतो परंतु ह्या गाडीच्या फेऱ्या आणि बोग्यांची संख्या खूपच कमी असल्याने तिकिटे उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे नव्याने स्वस्तात आणि सुरक्षित प्रवासाची हमी देणाऱ्या ई-रिक्षा हा एक उत्तम पर्याय निर्माण झाला आहे. रिक्षाचे स्टँड स्टेशन पासून साधारणपणे दोनशे मीटर अंतरावर आहे. रिक्षा स्टँड रेल्वे स्टेशनजवळ घेतल्यास सर्वांना सोयीचे होईल.**
> **- सदानंद गंधारे,पर्यटक मुंबई**

# ओवे परिसरातील डोंगरावर कारवी फुलांचा बहर

**। पनवेल । वार्ताहर ।**

७ ते ८ वर्षांनी एकदा उमलणाऱ्या कारवी फुलांनी खारघर मधील ओवे डोंगर बहरला आहे. या फुलांमधे भरपूर पराग आणि मकर मिळत असल्यामुळे मधमाश्या या बहराच्या वेळी कारवी फुलांच्या जाळीवरच डेरा देऊन बसत असल्याचे चित्र दिसते.

पश्चिम घाटातील सखल टेकड्यांवर तसेच कास पठारावर आढळणाऱ्या कारवी तसेच इतर फुलांचा मनमोहक आनंद लुटण्यासाठी पर्यावरण प्रेमी मोठ्या प्रमाणात जात असतात. मात्र, सह्याद्री पर्वतरांगा म्हणून ओळखला जाणारा खारघर डोंगर



विविध रंगीबेरंगी रान फुलांनी नटलेला आहे. विशेष तळोजा मध्यवर्ती कारागृह शेजारी असलेल्या ओवे डोंगर ७ वर्षांनी एकदा उमलणाऱ्या जांभळ्या रंगाच्या टपोरी कारवी फुलांनी बहरला आहे. याशिवाय हिरव्यागार गवतांच्या झाडाझुडपात बहरलेली लाल, पिवळी, गुलाबी, निळी, जांभळी, पांढरी रंगाची फुले आणि त्या फुलांवर मुक्तपणे बागडणारी फुलपाखरे पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. खारघर डोंगरावर जंगली फुलांच्या इतरही अनेक प्रजाती आहेत. विशेष म्हणजे सेरोपेजिया आणि सनड्यू दुर्मिळ वनस्पती डोगरावर बहरल्या आहेत. २०१६ नंतर यावर्षी कारवी फुलांनी ओवे डोंगर बहरला आहे. राज्यकर्ते आणि स्थानिक प्रशासनाने जैवविविधतेला आधार देण्यासाठी बेकायदेशीरपणे खारघर, ओवे डोंगराच्या पायथाशी होणारे खोदकाम आणि खाणकाम थांबविण्याची गरज आहे, असे पर्यावरण प्रेमींनी सांगितले.

# कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचार घराघरात पोहोचवा



■ माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांचे प्रतिपादन.

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण पूर्व विभागातील दहागाव विभाग पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेच्या डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयतील कृ. द. जोशी सभागृहात डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३७ वी. कर्मवीर जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

त्यावेळी प्रीतम म्हात्रे हे प्रमुख पाहुणे म्हणून आपल्या मार्गदर्शनपर भाषणात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य डी. बी.पाटील, रायगडचे विभागीय अधिकारी एम. के. कोंगरे, रायगडचे सहाय्यक विभागीय अधिकारी व्ही. यू. जगताप, रायगड भूषण ए. डी. पाटील, उद्योजक मयुर भोईर, पिरकोनच्या सरपंच कलावती पाटील , रमाकांत जोशी, सारडे सरपंच रोशन पाटील, चेअरमेन जीवन गावंड , प्राचार्य एस. एम बल्लाळ आर . के .म्हात्रे , आवारे गाव अध्यक्ष संजय गावंड, रायगड भूषण विलास म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्रीतम म्हात्रे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे विचारात प्रेरणा होती. कर्मवीर आण्णांनी कमवा आणि शिका अशी शिकवण दिली. आणि शिक्षणाची गंगा खेड्यापाड्यात आणली. रयतेचा राजा म्हणून कर्मवीर अण्णांचा उल्लेख करणे वावगे ठरणार नाही.अशा या महान शिक्षण महर्षीचे आपण सर्वांनी स्मरण करणे ही काळाची गरज आहे. असे सांगून, दहा गाव विभागातील पिराकोन या विद्यालयाच्या काही अडचणी असतील तर त्या दूर करण्यासाठी मी कटिबद्ध आहे. सध्या या विद्यालयासाठी ५ संगणक देऊ केले आहेत. शिक्षण क्षेत्रात कोणतेही राजकारण न आणता या विद्यालयाला भौतिक सुविधा प्राप्त होण्यासाठी मी कटिबद्ध आहे. असे सांगून, प्रीतम म्हात्रे यांनी विद्यालयाच्या प्रांगणाच्या भरावासाठी लागणाऱ्या मातीचा माझ्याकडून बंदोबस्त केला जाईल. असेही अभिवचन दिले. यावेळी एम.के. कोंगरे व व्ही. यु.जगताप यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तर कार्यक्रमात जीवन गावंड, डी.बी.पाटील, ए. डी. पाटील आदींची भाषणे झाली.

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- वरसोली, रायगड आदर्श नगर येथे ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ₹.५५ लाख प्रत्येकी, एकत्रित ४.४ कोटी संपूर्ण चेक पेमेन्ट - ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३५० मिटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत ₹.९० लाख बंगल्यासाठी योग्य - ९८२२२५७९२९
- चौल, रायगड मुख्य रस्त्यावर, मुखरी गणपतीजवळ १८ गुंठे बागायत आणि ५५ गुंठे शेती (७३ गुंठे) जमीन एकत्रित विकणे आहे. अपेक्षित किंमत रुपये ७ कोटी - ९८२२२५७९२९
- घरात घरकाम व मुलाची देखभाल करण्यासाठी केअर टेकर पाहिजे आहे. ठिकाण नागाव. कामाची वेळ सकाळी ९ ते संध्याकाळी ६ , पगार १००००. संपर्क- ७८७५८६६५५५.
- अलिबागमधील कार्यालयासाठी कर्मचारी आवश्यक आहेत. ताजे पदवीधर मुलाखतीसाठी येऊ शकतात. संपर्क : ९९२३७५०५४९, वेळ सकाळी ११ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत.
- वाडगाव येथे कॉटेज सांभाळण्याकरिता केअरटेकर पाहिजे. संपर्क-९७६२७७७९७५.
- अलिबाग-पिंपळभाट स्वामी समर्थ मठासमोर श्री प्रकाश अपार्टमेंट मधील २ BHK फ्लॅटस् विकणे आहेत. (प्रत्येक फ्लोअरवर फक्त २ फ्लॅट) संपर्क : ९४२२६९६१३३/९९२३१८४७०१
- दुकान गाळा भाड्याने देणे आहे. अलिबाग एसटीस्टँडजवळ ७०३८०९४०८९
- Shop For Sell Near Alibag St Stand 9764548679
- नांदगाव-मुरूड येथील कॉटेज श्री समर्थ रिसॉर्ट भाडेतत्त्वावर चालविण्यास देणे आहे. संपर्क - ९७६९४७४०६३
- अलिबागमधील नामांकित मोटार ट्रेनिंक स्कुलसाठी ड्रायव्हर पाहिजे. संपर्क : ९८२३४९२६२६/७९९८६११११
- इंटरनॅशनल फास्ट फूड कॅफे मध्ये कामासाठी मुले व मुली पाहिजेत ( अनुभवाची गरज नाही) Five star chicken अलिबाग कामाची वेळ : दुपारी १ ते रात्री ११ (पगार ९०००/-) पार्ट टाइम जॉब : संध्याकाळी ५ ते रात्री ११ ( पगार ६०००/-) संपर्क : call ९६१९३८३२२३/ Whatsapp ८९२८७५५८९५
- अलिबाग शहर येथील हॉस्पिटलच्या कामासाठी मावशीची (आया) आवश्यकता आहे. संपर्क- ९८२२४०९८४९, ९८५०३४८५०३.
- नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. १.रिसेप्शन (पेमेंट-९०००-१३००० अनुभवानुसार) किमान १-२ वर्षे अनुभव आवश्यक. २. कॉंटिनेंटल कुक (पेमेंट-२२००० आणि वर अनुभवानुसार) किमान-५ वर्षे अनुभव आवश्यक. अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळात संपर्क साधावा आणि व्हॉट्सॲपवर रेझ्युमे शेअर करावा. मोबाईल- ७५५९१८४६१२.
- IRCED मायक्रो फायनान्स कंपनीसाठी वावे, पेण, रोहा येथे महिला कर्ज अधिकारी नेमणे आहे. विवाहित महिलांना प्राधान्य. दुचाकी आवश्यक. संपर्क ८३२९५५११९१/८६०५२०४२१६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# चार गोवंशीय जनावरे यांची सुटका

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ येथील साई मंदिर नाका येथून सकाळी सव्वा सात वाजता गोवंशीय जनावरे यांची तस्करी केली जात होती.चार गोवंशीय जनावरे यांना कत्तलीसाठी नेली जात असल्याची माहिती मिळताच काही गोरक्षक यांनी नेरळ पोलीस यांना कळविण्यात आले आणि नंतर पोलिसांनी त्या जवावरे यांची सुटका केली असून त्या सर्व जनावरे यांची रवानगी गोशाळेत नेण्यात आली आहे.


आरोपींनी एकूण अडीच लाख किमतीचे बैल,गाय, जनावरे नेली जात होती.त्या ठिकाणी गोवंशीय जनावरे यांच्या तस्करी वाहतुकीसाठी नेली जात होती.त्या जनावरांची वाहतूक करताना संबंधित वाहनचालक यांच्याकडे कोणत्याही पराकारचे जनावरे खरेदी केलेल्या पावत्या नव्हत्या. त्याचवेळी त्या जनावरे यांची कोणत्याही प्रकारची वैद्यकीय तपासणी केली नसल्याने त्या सर्व जनावरे यांची बेकायदेशीर वाहतूक करीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे ती सर्व जनावरे यांची कत्तलीकरीता चोरी करुन टेम्पोमध्ये दाटीवाटीने भरून त्यांची चारा-पाण्याची व्यवस्था न करता भरून घेवून जाताना पकडले आहे. या गुन्ह्यातील आरोपीस अटक करण्यात आली आहे.

याबाबत नेरळ पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून पो.हवालदार गौतम वाघमारे अधिक तपास करीत आहेत.

# रुपाली गायकवाडची आयुर्वेदात एम.डी पदवी संपादन

**। पाली । वार्ताहर ।**

माणसाने जिद्द आणि चिकाटी बाळगली की कोणतेही काम सोपे होते आणि यश तुमच्या पदरात पडते. पाली तालुक्यातील सिद्धार्थनगर नाणोसे गावची कन्या डॉ. रुपाली गायकवाड यांनी आयुर्वेदात घवघवीत यश संपादन केले आहे. रुपाली यांनी आयुर्वेदात एम.डी. ही पदव्युत्तर पदवी संपादन केली आहे. त्यांच्या या कामगिरीमुळे सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून शुभेच्छा दिल्या जात आहेत.



परळी पंचक्रोशीतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते गेणू सोमा गायकवाड व परळी ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच अनुसया गायकवाड यांची नात, चंद्रशेखर गायकवाड यांची डॉ. रूपाली या कन्या आहेत.

अतिशय मेहनतीने व अभ्यासाच्या जोरावर डॉ. रुपाली गायकवाड यांनी हे यश प्राप्त केले आहे. मुंबई वरळीमधील पोद्दार आयुर्वेद मेडिकल कॉलेजमधून एम.डीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले आहे. हे करीत असताना प्रत्येक वर्षात प्रथम श्रेणीततून उत्तीर्ण झाल्या आहेत. जिद्द आणि जिकाटीच्या जोरावर त्यांनी हे शिक्षण पूर्ण केले आहे.

# माहिती अधिकार दिन साजरा

**रसायनी** - तुपगाव ग्रामपंचायतीत माहीती अधिकार दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी माहीती अधिकार फेडरेशनचे तालुका अध्यक्ष वसंत पाटील यांनी मार्गदर्शन केले. सरपंच रविंद्र कुंभार यांनी वसंत पाटिल यांचे स्वागत केले.यावेळी चौक ग्रामपंचायतीच्या सरपंच रितू ठोंबरे उपस्थित होत्या. याप्रसंगी अंगणवाडी सेविका, तलाठी, मंडळ अधिकारी, आरोग्य कर्मचारी व इतर शासकीय कर्मचारी व निम शासकीय कर्मचारी उपस्थीत होते.या कार्यक्रमासाठी जवळपास १०० लोकांनी सहभाग घेतला. ग्रामपंचायतीच्या व माहिती आधिकार फेडरेशनच्यावतीने माहीती अधिकार अधिनीयम २००५ या कायद्याची जनजागृती करण्यात आली.याप्रसंगी गजानन साळवी यांनी मेहनत घेतली. उमेश साळवी यांनी समस्या मांडल्या. सुरेश गावडे व सकपाळ यांनी मनोगत व्यक्त केले.

# मुलींना सुरक्षितता मार्गदर्शन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत रेल्वे पोलीस यांनी कर्जत शहरातील अभिनव शाळेमधील मुलींना स्व संरक्षणाबाबत मार्गदर्शन केले. यावेळी अल्पवयीन मुलांसाठी असलेल्या कायद्याची माहिती पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मुंबई लोहमार्ग पोलीस आयुक्तालयातील कर्जत रेल्वे पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील आणि शहर हद्दीतील विद्यार्थ्यांना नवीन फौजदारी कायदे २०२३ चे प्रशिक्षण व कायदा साक्षर व सायबर सुरक्षा या अनुषंगाने शाळेत व्याख्यान आयोजित केले होते.अभिनव ज्ञान मंदिर शाळेतील २०० विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

या प्रसंगी कर्जत रेल्वे पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकेश ढगे,पोलीस उप निरीक्षक भाऊसाहेब कुरुंद, शाळेचे मुख्याध्यापक धुराजी शिंदे, उप मुख्याध्यापक अंकिता दाभाडे, पर्यवेक्षक अनिल गलगले आदी प्रमुख व्यासपीठावर उपस्थित होते. सदर प्रशिक्षण व व्याख्यान करिता अभिनव ज्ञान मंदिर हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमधील शिक्षक आणि प्राध्यापक वर्ग उपस्थित होता.कार्यक्रमाचे सूत्र संचालन सोनाली मराठे यांनी केले.तर शिक्षक मेहेर, बाविस्कर, विजय माने, उपाध्याय, दळवी, खडे, मोरे आदी उपस्थित होते.

या प्रशिक्षण कार्यशाळेमध्ये विद्यार्थ्यांना भारतीय न्याय संहिता २०२३ , भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ व भारतीय साक्ष अधिनियम २०२३ बाबत माहिती देण्यात आली.नवीन आणि जुने कायद्यांची तुलनात्मक बदलाची माहिती चांगल्या प्रकारे दिली आहे.

उपस्थित विद्यार्थ्यांना यांना नवीन कायदे आणि त्यातील सुधारणा याबाबत मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानामध्ये उपस्थित विद्यार्थ्यांना अधिकारी आणि अंमलदार यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देऊन त्यांचे समाधान केलेले आहे.

### लोक न्यायालयामध्ये १३ हजार ५२९ प्रकरणे निकाली

# 25 कोटींची केली वसुली

■ प्रलंबित खटल्यांचा सामोपचाराने निपटारा

**। रायगड । प्रतिनिधी ।**

दाखलपूर्व आणि प्रलंबित खटल्यांचा जलद निपटारा व्हावा आणि प्रलंबित खटले सामोपचाराने मिटावेत या हेतूने आयोजित केलेल्या रायगड जिल्ह्यात झालेल्या लोकन्यायालयात अनेक प्रकरणे निकाली काढण्यात आली असून वादपूर्व व दाखल अशी एकूण १३ हजार ५२९ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे अशी माहिती जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश अमोल अ. शिंदे यांनी दिली आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयांतील प्रलंबित प्रकरणे तसेच वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. रायगड जिल्ह्याचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजंदेकर यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये रायगड जिल्ह्यातील ५० हजार ७०९ वादपूर्व प्रकरणे व ९ हजार १३२ प्रलंबित अशी एकूण ५९ हजार ८४१ प्रकरणे लोक अदालतीमध्ये ठेवण्यात आली होती.



त्यापैकी १२ हजार १७३ वादपूर्व प्रकरणे व १ हजार ३५६ प्रलंबित प्रकरणे अशी एकूण १३ हजार ५२९ प्रकरणे सामंजस्याने मिठवून लोक अदालतीमध्ये निकाली निघाली असून त्याद्वारे पक्षकारांना एकूण २५ कोटी ५८ लाख ६७ हजार ३६ रुपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात आली आहे.

रायगड जिल्ह्यातील लोकन्यायालयात जोडप्यांचा (पेण-२. रोहा-१. खालापूर-१) सामंजस्याने वाद मिटल्यामुळे संसार सुरळीत झाला आहे.

जिल्ह्यामध्ये एकूण २५ मोटार अपघात प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून पक्षकारांना २ कोटी ३९ लाख ७६ हजार ७०० इतकी नुकसान भरपाईची रक्कम मंजूर करण्यात आली आहे. अलिबाग येथील पक्षकारांचा जिल्हा न्यायाधीश क. १. डॉ. सृष्टी निळकंठ व पॅनलवरील न्यायाधिशांनी पुष्पगुच्छ देवून सत्कार केला.रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयांत २७ लोक अदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोक अदालतीमध्ये पश्चकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलचा वापर करुनसुध्दा प्रकरणे मिटविण्यात आली.

या लोक न्यायलयाला यशस्वी करण्यासाठी सर्व न्यायिक अधिकारी, वकील वर्ग, जिल्हा परिषद, रायगड पोलीस अधिक्षक, रायगड व सर्व पोलीस कर्मचारी, सर्व पक्षकार यांनी भरघोस प्रतिसाद दिल्याबद्दल जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश ए. एस. राजदेकर व न्यायाधीश तथा सचिव अमोल शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

# सुनील माळी यांना पुरस्कार

**रसायनी** : एशियन बुक पब्लिकेशन आणि समृध्दी प्रकाशन व राष्ट्रीय पर्यावरण संरक्षण बहुउद्देशीय सामाजिक संस्था ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित निसर्ग साधना सामाजिक संमेलन ठाणे येथे पार पडले.या कार्यक्रमाला सुप्रसिध्द जेष्ठ अभिनेते चंद्रशेखर कुलकर्णी यांच्याहस्ते रसायनी तील सावळे ग्रामपंचायतीचे सरपंच सुनील सदाशिव माळी यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल सोशल वर्कर आयकॉन अवॉर्डने सन्मानित करण्यात आले. सरपंच सुनील माळी यांनी सामाजिक कार्य जोपासत विविध क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे. त्यांनी सरपंचपद स्विकारल्या पासून सामाजिक बांधिलकी जोपासत नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचा कार्याचा गौरव केला.

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, सौ.शैला गजानन बोराडे, यांनी फ्लॅट मालक श्री. संजय वासुदेव पवार, यांचेकडून त्यांचे ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची खालील वर्णनाची फ्लॅट मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

मौजे मुद्रे बुद्रुक, ता. कर्जत जि. रायगड, येथील सिटी सर्व्हे नंबर १/१, प्लॉट नंबर ४, या मिळकतीवरील हरिद्वार अपार्टमेंट, या इमारतीमधील, विंग, तळ मजल्यावरील सदनिका क्रमांक ००३, क्षेत्र ४४३ चौ. फुट,

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून, ७ (सात) दिवसांचे आत, खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच फ्लॅट विक्री करारनामा करुन पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड, पिन - ४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि. ३०/०९/२०२४

## जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव वढाव (बुद्रुक) येथील खालील वर्णनाची मिळकत श्री. सुधाकर नारायण मयेकर यांचे मालकीची असून त्याबाबत आमचे अशिल सौ. किरण प्रकाश किंजवडेकर वगैरे यांचेबरोबर विक्रीव्यवहार ठरविण्यांत आला होता.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १९० | १ | ०-६२-९ पैकी ०-३५-० | १३-३५ |

श्री. मयेकर यांनी करारानुसार व्यवहार पूर्ण न केल्याने आमचे अशिलांनी अलिबाग कोर्टामध्ये कराराच्या विशेष पूर्ततेकरिता स्पेशल मुकदमा १६/२००८ या क्रमांकाचा दावा दाखल केला होता. दुतर्फा सुनावणीनंतर कोर्टाने सदर दावा तारीख १०/०४/२०१४ रोजी मंजूर केला असून, श्री. सुधाकर मयेकर यांनी वर नमूद जमिनींच्या एकत्रिकरण योजनेमधील त्रुटीबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडे योग्य ते प्रकरण दाखल करून, सदर त्रुटी दूर करून, त्यानंतर गट नंबर १९०/१ पैकी ३५ आर. क्षेत्राबाबत खरेदीखत आमचे अशिलांचे लाभांत करून देण्याचे, सदर निकालाद्वारे आदेशित केले आहे. त्यामुळे साठेकरारानुसार खरेदीखत करून मिळण्याचा आमचे अशिलांचा हक्क कोर्टाने मान्य केला आहे. सदर न्यायनिर्णयाविरूद्ध श्री. मयेकर यांनी अपील दाखल केले असून, दिवाणी अपील ५२/२०१६ या क्रमांकाने ते प्रलंबित आहे.

दिवाणी कोर्टाने दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये एकत्रिकरण योजनेमध्ये चूक असल्याबाबत निर्णित केल्यामुळे जोपर्यंत एकत्रिकरण योजनेतील गट नंबर १९० / १ बाबतची चूक दुरूस्त केली जाणार नाही तोपर्यंत गट नंबर १९०/१ चे नेमके क्षेत्र कोणते याची निश्चिती होणार नाही. त्यामुळे आमचे अशिलांस विक्री करण्याचे ठरविलेले व कोर्टाने ज्याबाबत हुकुमनामा दिला आहे ते ३५ आर. क्षेत्र कोणते हे देखील तोपर्यंत निश्चित होणार नाही. वर नमूद केल्यानुसार वस्तुस्थिती असूनही, सदर मिळकतीपैकी ५ आर. क्षेत्राची श्री. मयेकर यांनी श्री. मनिष विष्णू म्हात्रे यांस बेकायदेशीरपणे विकी केली असल्याचे व सदर मिळकतीवर श्री. म्हात्रे यांनी व्यापारी गाळ्यांचे बांधकाम सुरू केले असल्याचे आमचे अशिलांस समजले आहे. त्याबाबत योग्य ती कारवाई आमचे अशिल स्वतंत्रपणे करणार आहेत.

वर नमूद केल्यानुसार वस्तुस्थिती असल्याने, आता सदर मिळकतीवर कोर्टाच्या हुकूमनाम्याचा बोजा असून, सदर संपूर्ण मिळकतीबाबत अथवा त्यापैकी अंशतः भागाबाबत श्री. सुधाकर मयेकर यांचेबरोबर किंवा अपील प्रलंबित असताना गट नंबर १९०/१ पैकी अंशतः क्षेत्र खरेदी करणारे श्री. मनिष विष्णू म्हात्रे यांचेबरोबर कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करणे कोर्टाच्या हुकुमनाम्या विरूद्ध ठरणार आहे.

तरी सर्वांना याद्वारे असे सूचित करणेत येते की, गांव वढाव (बुद्रुक) येथील गट नंबर १९०/१ अथवा भागाबाबत व्यवहार श्री. सुधाकर मयेकर यांचेबरोबर किंवा अपील प्रलंबित असताना खरेदी करणारे श्री. मनिष विष्णू म्हात्रे म्हात्रे यांचेबरोबर करू नये. अन्यथा सदर व्यक्तींविरूद्ध देखील सक्त कोर्टकारवाई आमचे अशिल सुरू करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २९/०९/२०२४ सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसाने कळविण्यात येते की, आमचे अशिल १.श्री. मोहन परशूराम नाईक पत्ता- मु.पो-दादर ता.पेण जि.रायगड २. श्री. महेंद्र नथुराम कुंभार पत्ता- कुंभार आळी ता.पेण, जि.रायगड यांनी जमिन मालक १.श्री. सतेज सदानंद चिंचलीकर, पत्ता- लोकमान्य को. ऑप. हौसिंग सोसायटी, ता.पेण, जि.रायगड, यांचेकडून कायमस्वरूपी जमिन मिळकत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या जमिन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

| गांव | सर्व्हे नं/ गट नं. | क्षेत्र(हे.आर) | आकार (रु.पै) |
|---|---|---|---|
| मौजे बोरगांव ता.पेण जि. रायगड | २६५/१ | ०-५२-००<br>पो.ख ०-१०-००<br>एकूण ०-६२-०० | ६.९८ |

वर वर्णन केलेली संपूर्ण जमिन मिळकत ही आमचे अशिल कायमस्वरूपी रजिस्टर खरेदीखताने विकत घेत आहेत.

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवुन माझी खात्री पटवुन द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करतील व मागाहुन येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण सही/-
दि. ३०/०९/२०२४
**ॲड. उमेश वामन पाटील**
पत्ता-मु.पो.कांदळेपाडा
ता.पेण,जि.रायगड
मो.९८२२६२६११८

## जाहीर सुचना

सर्व संबधितांना याद्वारे कळविण्यात येते की, मौजे गोठेघर,ता. अलिबाग, जि. रायगड, येथील खाली नमुद वर्णनाची शेतजमिन मिळकत,श्री. सुरेश शिवराम पाटील, राहणार गोठेघर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या मालकीची असून, सदरील शेतजमिन मिळकत सर्व हक्क व अधिकारासाहित,सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझे अशिलांनी कायमस्वरुपी खरेदीकरण्याचे मान्य व कबूल केलेआहे. सदर जमिन मिळकत पूर्णतःनिर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून चौदा (१४) दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापान क्र. उपविभाग | क्षेत्र(हे.आर ) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| गोठेघर, ता. अलिबाग. | २/३/ब | ००-३३-१० एकूण | ०७-१० |

अलिबाग,
दिनांक :२९-०९-२०२४

**सही/-**
**(ॲड. संजय म. भगत )**
**हिराबाग सोसायटी,**
**अे विंग, टिळक रोड,**
**अलिबाग-रायगड.**
**खरेदीदाराचे वकील**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक धनश्री धनंजय दरेकर यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे वैजनाथ तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| भूमापन क्र. व उपविभाग/ सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|
| २/१ | एकुण ०-०४-५० हे आर पॉ | ०-०५ |
| २/३ | एकुण ०-०९-०० हे आर पॉ | ०-०५ |
| २/५ | एकुण ०-०५-०० हे आर पॉ | ०-०३ |
| २/६ | एकुण ०-०३-०० हे आर पॉ | ०-०२ |

या जमिन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध बयानापावती, खरेदीखत, साठेकरार गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कव्यवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही. किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक ३०/०९/२०२४
**ॲड. निलेश काहु मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं. २९ तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग,
भारत गॅस समोर. अमराई रोड, कर्जत
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१

## सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत यांचे कार्यालय

**कार्यालयीन पत्ता :** सहकार नगर, मार्केट यार्ड, दहिवली तर्फे निड, ता.कर्जत, जि.रायगड - ४१० २०१

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये जाहीर नोटीस**

**जा.क्र.:** सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, कर्जत कलम १०१/११९३/२६.०९.२०२४

**साई प्रेरणा को-ऑप केडिट सोसायटी लि., मुंबई**
ऑफिस नं. २१०, २ रा मजला, देवी अन्नपुर्णा प्रिमायसेस को-ऑप सोसा. लि.,
प्लॉट नं. ८, सेक्टर १८, वाशी, नवी मुंबई ४०० ७०५. **वादी / अर्जदार**

**विरूद्ध**

अनुक्रमांक १ ते ३

खालील दर्शविलेल्या जाब देणार यांना नोटीस देण्यात येते की, थकीत कर्जाविषयी अर्जदार पतसंस्थेने दाखल केलेल्या वसुली अर्जाबाबत आपले म्हणणे सादर करणेसाठी आपणास उपलब्ध पत्त्यावर नोटीस देण्यात आली होती. तथापि सदर पत्त्यावर आपण राहत नसल्याने तसेच आपला सध्याचा पत्ता उपलब्ध नसल्याने सदर नोटीसद्वारे आपणास एक शेवटची संधी देण्यात येत असून दिनांक ०९/१०/२०२४ दुपारी ४.०० वाजता आपण स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत या कार्यालयात हजर राहून आपले म्हणणे नमूद करावे. सदर दिवशी आपण हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत अर्जाची चौकशी करण्यात येऊन एकतर्फी योग्य तो निर्णय घेतला जाईल, याची आपण नोंद घ्यावी.

| अ.क. | जाब देणाऱ्याचे नाव | अर्ज दाखल दि. | दावा कमांक | दावा रक्कम | जामिनदार क.१ | जामिनदार क.२ | जामिनदार क.३ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | हितेश नारायण बोराडे | ०१/०७/२०२४ | ६३६/१ | ९९२११ | सुनिल दशरथ बोराडे | करण प्रमोद तळेगावकर | - |
| २ | ज्योती लहु ऐनकर | ०१/०७/२०२४ | ६३६/९ | १०४३२० | शैला विठ्ठल विरले | गुरूनाथ मंगल ऐनकर | - |
| ३ | अंकुश वसंत ऐनकर | ०१/०७/२०२४ | ६३६/११ | १०४१४० | गुरूनाथ मंगल ऐनकर | शैला विठ्ठल विरले | लहु वसंत ऐनकर |

ही नोटीस आज दिनांक २६/०९/२०२४ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

**स्थळ : कर्जत**
**दिनांक : २६/०९/२०२४**
शिक्का
**सही/-**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था कर्जत यांचे कार्यालय**

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५-१६

## मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव बुधवार दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहीर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळुन दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजेपर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे .**

| अ. क्र. | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसुली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. श्री. सुधीर बाळाराम पवार पत्ता:- न्यु. मधुबन सोसा. रूम नं. २७, जुना ठाणा नाका रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री उमेश रामचंद्र खेडेकर पत्ता :- मु.पो.ता. पनवेल, जि.रायगड<br>३. श्री रविंद्र महादेव कोर्पे पत्ता :- मु. जुना पोस्ट, नवेनगर, महाड, ता.महाड जि.रायगड | अर्ज क्र २१९/२०२० जा.क्र. सनिम/का-२ राजिमस/बँक/क-१०१/वदा अ.क्र. १६८, २०२० दिनांक ०५/१०/२०२० | रू. १,०५,०००/-<br>रू. ३९,५५,०००/- | श्री चंद्रकांत लाडक्या पवार यांचे नावे असलेली मौजे कोल, ता. महाड हद्दीतील मालमत्ता<br>१. गट क्र. ५/१० क्षेत्र ०.०३.० हे.आर.<br>२. गट क्र. ९१/१५ क्षेत्र १.१३.० हे.आर. |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ३०/०९/२०२४

**डी.एम. जाधव**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## e-TENDER NOTICE –

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | *Esti. Cost* |
|---|---|---|
| Tend-34/ 24-25 RFX 7000031585 .3rd call | Shifiting of tower loc. No. 116 & 117 from hill top of 100kV Jite - Thal - TSS D/C line under EHV (O&M) Division Panvel. | Rs.76.16 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 27.09.2024 to 04.10.2024 up to 11:00 hrs, Opening date:-04.10.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## जाहीर नोटीस

जिल्हा रायगड, तालुका अलिबाग पैकी गांव वढाव (बुद्रुक) येथील खालील वर्णनाची मिळकत सौ. वीणा विजय आठवले यांचे मालकीची असून त्याबाबत आमचे अशिल सौ. किरण प्रकाश किंजवडेकर वगैरे यांचेबरोबर विक्रीव्यवहार ठरविण्यांत आला होता.

| गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| १९१ | - | ०-३०-६ | २=९८ |

सौ. आठवले यांनी करारानुसार व्यवहार पूर्ण न केल्याने आमचे अशिलांनी अलिबाग कोर्टामध्ये कराराच्या विशेष पूर्ततेकरिता स्पेशल मुकदमा १०/२००८ या क्रमांकाचा दावा दाखल केला होता. दुतर्फा सुनावणीनंतर कोर्टाने सदर दावा तारीख १०/०४/२०१४ रोजी मंजूर केला असून, सौ. आठवले यांनी वर नमूद जमिनीच्या एकत्रिकरण योजनेमधील त्रुटीबाबत सक्षम अधिकाऱ्यांकडे योग्य ते प्रकरण दाखल करून, सदर त्रुटी दूर करून, त्यानंतर गट नंबर १९१ बाबत खरेदीखत आमचे अशिलांचे लाभांत करून देण्याचे, सदर निकालाद्वारे आदेशित केले आहे. त्यामुळे साठेकरारानुसार खरेदीखत करून मिळण्याचा आमचे अशिलांचा हक्क कोर्टाने मान्य केला आहे. सदर न्यायनिर्णयाविरूद्ध सौ. आठवले यांनी अपील दाखल केले असून, दिवाणी अपील ५१/२०१६ या क्रमांकाने ते प्रलंबित आहे.

दिवाणी कोर्टाने दिलेल्या न्यायनिर्णयामध्ये एकत्रिकरण योजनेमध्ये चूक असल्याबाबत निर्णित केल्यामुळे जोपर्यंत एकत्रिकरण योजनेतील गट नंबर १९१ बाबतची चूक दुरूस्त केली जाणार नाही तोपर्यंत गट नंबर १९९ चे नेमके क्षेत्र कोणते याची निश्चिती होणार नाही. वर नमूद केल्यानुसार वस्तुस्थिती असूनही, सदर मिळकतीपैकी सुमारे २ आर. क्षेत्रावर सौ. आठवले यांनी वीटभट्टी लावण्यास बेकायदेशीरपणे परवानगी दिली असल्याचे व सदर मिळकतीची त्रयस्थ व्यक्तीस विकी करण्याचा प्रयत्न चालू असल्याचे आमचे अशिलांस समजले आहे.

वर नमूद केल्यानुसार वस्तुस्थिती असल्याने, आता सदर मिळकतीवर कोर्टाच्या हुकूमनाम्याचा बोजा असून, सदर संपूर्ण मिळकतीबाबत अथवा त्यापैकी अंशतः भागाबाबत सौ. वीणा विजय आठवले यांचेबरोबर कोणत्याही स्वरूपाचा व्यवहार करणे कोर्टाच्या हुकुमनाम्या विरूद्ध ठरणार आहे.

तरी सर्वांना याद्वारे असे सूचित करणेत येते की, गांव वढाव (बुद्रुक) येथील गट नंबर १९१ अथवा भागाबाबत व्यवहार सौ. वीणा आठवले यांचेबरोबर करू नये. अन्यथा सदर व्यक्तींविरूद्ध सक्त कोर्टकारवाई आमचे अशिल सुरू करतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

तारीख : २९/०९/२०२४ सही/-
**ॲड. राजेंद्र मधुसूदन कुंटे**
शांतादुर्गा कोऑप. हौसिंग सोसायटी,
मारुती नाका, अलिबाग, रायगड.

मे. वसुली व विक्री अधिकारी यांचे कार्यालय
द्वारा रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.
अलिबाग केंद्र कार्यालय अलिबाग निलीमा हॉटेल
शेजारी चेंढरे ता. अलिबाग जि. रायगड
फोन क्र. ०२१४१-२२४३१५ -१६

## मिळकतीचा जाहीर फेर लिलाव विक्री जाहीरनामा

महाराष्ट्र संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व नियम १०७ अन्वये लवाद वसुली दाखल्यानुसार खालील नमुद केलेल्या कर्जदाराच्या जप्ती आदेशाने जप्त केलेल्या स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव बुधवार दिनांक ३०/१०/२०२४ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता बँकेचे केंद्र कार्यालय अलिबाग जि. रायगड येथे केला जाईल. लिलावाच्या अटी व शर्ती विक्री जाहीरनामा केंद्र कार्यालय अलिबाग येथे बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेला आहे. या करीता जाहिर लिलावात भाग घेण्याकरीता अनामत रक्कम रु.५०,०००/- (अक्षरी पन्नास हजार मात्र) भरणे आवश्यक आहे. अनामत रक्कम स्विकारण्याची अंतीम मुदत रविवार व सुट्टीचे दिवस वगळून दिनांक २९/१०/२०२४ रोजी सायंकाळी ३.३० वाजे पर्यंत राहील. परंतु लिलावाच्या दिवशी १ तास अगोदर एखाद्या इसमाने जाहिर लिलावात भाग घेण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्याचे कडुन अनामत रक्कम भरुन घेवून त्यास जाहिर लिलावात बोली लावण्यास अनुमती देण्याबाबत विचार भरणा करण्यात येईल. अनामत रक्कम भरणा केल्याशिवाय जाहिर लिलाव प्रक्रीयेत भाग घेता येणार नाही. तसेच ज्या स्थावर मालमत्तेच्या लिलाव प्रक्रियेत भाग घ्यावयाचा आहे त्याच्या स्थावर मालमत्तेचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

**कर्जदार व स्थावर मालमत्तेचा तपशिल खालीलप्रमाणे..**

| अ. क्र | कर्जदार व जामिनदारांची नावे | वसूली दाखला क्र. व दिनांक | राखीव किंमत | जप्त केलेल्या व लिलावात विक्री करणेत येणाऱ्या स्थावर मालमत्तेचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| १. | २ | ३ | ४ | ५ |
| १. | **कर्जदार**<br>१. सौ. प्रमिला सुधीर पवार पत्ताः- न्यु मधुबन सोसा. रूम नं. २७, जुना ठाणा नाका रोड, जुने-पनवेल,ता. पनवेल जि. रायगड<br>**जामिनदार**<br>२. श्री उमेश रामचंद्र खेडेकर पत्ता :-मु.पो.ता.पनवेल, जि. रायगड<br>३. श्री रविंद्र महादेव कोर्पे, पत्ता :- मु. जुना पोस्ट, नवेनगर महाड, ता. महाड, जि.रायगड | अर्ज क्र. २१८/२०२० जा.क्र.सनिम/का-२/ राजिमस बँक/क-१०१ /वदा, अ.क्र.१/१६७ २०२०, दिनांक ०५/१०/२०२० | रू. २,४१,५००/-<br>रू. ४,३७,५००/-<br>रू. १,०५,०००/-<br>रू. २,१०,०००/-<br>रू. ३,५०,०००/-<br>रू. ३,४६,५००/-<br>रू. १२,४२,०००/- | श्री चंद्रकांत लाडक्या पवार यांचे नावे असलेली मौजे कोल ता. महाड हद्दीतील मालमत्ता<br>१. गट क्र. ५/५, क्षेत्र ०.०६.९ हे.आर.<br>२. गट क्र. ५/७, क्षेत्र ०.१२.५ हे.आर.<br>३. गट क्र. ५/९, क्षेत्र ०.०३.०<br>४. गट क्र. ९१/१७, क्षेत्र ०.०६.०<br>५. गट क्र. ८१/९ ब, क्षेत्र ०.१०.० हे.आर.<br>६. श्री. सुधीर बाळाराम पवार यांचे नावे असलेली मौजे गोठे बु.ता. महाड येथील मालमत्ता गट क्र. २३/२, क्षेत्र ०.०९.०९<br>७. ग्रुप ग्रामपंचायत गोठे बु. हद्दीतील घर क्र. ३५५, क्षेत्र १३८० चौ. फूट |

**स्थावर मालमत्ता जाहिर फेर लिलावाच्या अटी व शर्ती**

**अटी व शर्ती :-**

१) सोबतचे यादीत वर्णन केलेली स्थावर मालमत्ता आहे त्या ठिकाणी आहे त्या परिस्थितीत विकणेंत येईल.
२) लिलावात भाग घेणेसाठी व बोली बोलणेसाठी रक्कम रू.५०,०००/- मात्र अनामत भरावी लागेल.
३) वाजवी किंमतीपेक्षा कमी बोली नोंदल्या जाणार नाहीत.
४) शासन मान्यता प्राप्त अधिकृत व्हॅल्युअर (सक्षम अधिकारी) यांचे मुल्यांकन दाखल्याच्या किंमतीपेक्षा व वाजवी किंमतीपेक्षा स्थावर मालमत्ता विक्रीची रक्कम कमी स्विकारली जाणार नाही.
५) सर्वात जास्त बोली स्विकारणे अथवा न स्विकारणे हे बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी यांचेवर अवलंबून राहील.
६) ज्यांचे नावे लिलाव पूर्ण करणेत येईल त्याने बोली रक्कमेच्या किमान २५ टक्के रक्कम ताबडतोब अनामत भरली पाहिजे. तसे न केल्यास फेर लिलाव केला जाईल.
७) ज्याचे नावे लिलाव पुरा करणेत येईल त्याने उरलेली बोली रक्कमेच्या ७५ टक्के रक्कम लिलावाचे तारखेपासून ३० दिवसांचे आत भरणा करणे आवश्यक आहे. तसे न केल्यास आधी भरलेली २५ टक्के रक्कम (लिलावाचा खर्च वजा करून) सरकारी खजिन्यांत जमा करणेंत येईल.
८) विक्री केलेल्या मालमत्तेवरील कर, विमा इत्यादी कर खरेदी दराने भरले पाहिजे. तसेच विक्री केलेल्या मालमत्ते संदर्भात मोजणी व त्या अनुषंगाने इतर कामे खरेदीदाराने करावयाचे आहेत.
९) बोली किमान किती रक्कमेने वाढवावयाची ती रक्कम लिलावाचे वेळी बँकेचे विशेष वसुली व विक्री अधिकारी ठरवतील.
१०) खरेदीदाराने कसूर केल्यास फेरलिलाव करण्याची वेळ आल्यास त्यासाठी होणारा खर्च व खरेदीदाराने बोललेल्या किंमतीपेक्षा फेर लिलावाचे दुसऱ्या खरेदीदाराने बोललेली रक्कम कमी आल्यास अशी कमी होणारी रक्कम पहिल्या खरेदीदाराकडून वसुल केली जाईल.
११) पहिल्या विक्री पेक्षा दुसऱ्या विक्रीची किंमत जास्त असल्यास पहिल्या खरेदीदारास त्या जास्त असलेल्या किंमतीवर हक्क सांगता येणार नाही.
१२) ज्यावेळी स्थावर मालमत्तेची विक्री नियमाप्रमाणे कोणत्याही कारणास्तव कायम करणेत आली असेल त्यावेळी खरेदीदाराने भरलेली अनामत रक्कम लिलावाच्या रक्कमेतून कमी करणेत येईल.
१३) थकबाकीदाराने लिलाव उदघोषणे प्रमाणे होणारी सर्व रक्कम आणि लिलाव किंमतीच्या ५ टक्के रक्कम अर्जासह विक्री अधिकारी यांच्याकडे सुपूर्त केल्यास विक्री अधिकारी लिलाव रद्द करतील आणि लिलाव रद्द झाल्यास किंमतीच्या ५ टक्के रक्कम अधिक लिलावात खरेदी दाराने भरलेली सर्व रक्कम खरेदीदारास परत केली जाईल.
(१४) स्थावर मालमत्ता ज्या बोलीदाराचे नावाने अंतिम आदेशाने देण्याचा आदेश होईल त्या बोलीदाराने खरेदीखताच्या स्टॅम्प ड्युटीचा व इतर अनुषंगिक खर्च करावयाचा आहे.
१५) खरेदीदाराने लिलाव कायम केल्यास स्थावर मालमत्तेचा ताबा ३० दिवसांचे आत घेतला पाहिजे.
१६) सकारण लिलाव रद्द करणेचा अगर एखादी अट शिथिल करणेचा अधिकार विशेष वसुली व विक्री अधिकारी यांनी राखून ठेवलेला आहे.
१७) महाराष्ट्र अधिनियम १९६० व नियम १९६१ चे नियम १०७ मधील संबंधीत तरतुदी लिलाव खरेदीदारावर बंधनकारक राहतील.
(१८) जाहीर लिलावात भाग घेणाऱ्या इसमाने जास्तीत जास्त बोली बोलून लिलाव घेतला असेल तरी कर्जदाराने ३० दिवसांच्या आत संपुर्ण रक्कम भरून विनंती केल्यास सदरचा लिलाव रद्द होईल व लिलाव घेणाऱ्या इसमास त्याने भरलेल्या रक्कमेवर १२ टक्के दराने व्याजासह रक्कम परत केली जाईल.

अलिबाग
दिनांक : ३०/०९/२०२४

**श्री.डी.एम. जाधव**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**दि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. अलिबाग**

**निवडक**

## मोहम्मद युसूफचा राजीनामा

**लाहोर :** पाकिस्तान क्रिकेट संघात मोठा बदल होण्याची शक्यता आहे. पाकिस्तानचा माजी क्रिकेटपटू मोहम्मद युसूफ यांनी मोठा निर्णय घेतला आहे. त्यांनी पाकिस्तानच्या पुरुष क्रिकेट संघाच्या निवड समितीमधील निवडकर्ता म्हणून राजीनामा दिला आहे. ५० वर्षीय मोहम्मद युसूफ यांनी सोशल मीडियावर पोस्ट शेअर करत माहिती दिली आहे. त्यांनी सांगितलं की, त्यांनी हा निर्णय वैयक्तिक कारणाने घेतला आहे. मोहम्मद युसूफ यांना मार्च २०२४ मध्ये निवडकर्ता म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

## श्रीलंका तिसऱ्या स्थानावर

**कोलंबो :** श्रीलंका क्रिकेट संघाने रविवारी न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिकेतील दुसऱ्या सामन्यात एक डाव आणि आणि १५४ धावांनी विजय मिळवला. ही कसोटी मालिका वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीप २०२३-२५ स्पर्धेचा भाग होती. त्यामुळे या मालिकेच्या निकालाचा परिणाम टेस्ट चॅम्पियनशीप स्पर्धेच्या पॉइंट्स टेबलवरही झाला आहे. श्रीलंकने या विक्रमी विजयासह पॉइंट्स टेबलमधील आपले तिसरे स्थान आणखी भक्कम केले आहे. सध्या अव्वल दोन क्रमांकावर अनुक्रमे भारत आणि ऑस्ट्रेलिया कायम आहेत.

## राष्ट्रीय संघाकडून छळ

**सोल :** पॅरिस ऑलिम्पिक स्पर्धेत दक्षिण कोरियाच्या ॲन-से यंग या खेळाडूने महिलांच्या एकेरी प्रकारात सुवर्णपदकाला गवसणी घातली. पण तिच्या या यशामागे अनेक वेदना असल्याचे आता समोर येत आहे. तिचा दक्षिण कोरियाच्या राष्ट्रीय संघाकडून छळ करण्यात आल्याचे समोर आले आहे. तिला वर्षानुवर्षे शारिरीक आणि शाब्दिक आत्याचाराचा सामना करावा लागला आहे. तसेच, तिला अनेक अपमानास्पद कामंही करायला लावण्यात आली, ज्यात पुरुष खेळाडूंची अंतवस्त्रही तिला धुण्यासाठी सांगण्यात येत होते.

## पूरनचा नवा विक्रम

**बार्बाडोस :** वेस्ट इंडिजमध्ये कॅरेबियन प्रीमिअर लीग सुरू आहे. या संपूर्ण लीगमध्ये निकोलस पूरन धमकेदार फलंदाजी करताना पाहायला मिळत आहे. या लीगमध्ये त्रिंबागोकडून खेळताना बार्बाडोस संघाविरुद्धच्या सामन्यात पूरनने नवा विक्रम रचला आहे. पूरनने १५ चेंडूत २७ धावांची खेळी केली. या खेळीसोबत पूरनने २०२४ वर्षात २,०५९ टी-२० धावा पूर्ण केल्या आहेत. एका वर्षात सर्वाधिक टी-२० धावा करणाऱ्या खेळाडूंच्या यादीत पूरनने पाकिस्तानच्या मोहम्मद रिझवानला मागे टाकत अव्वल स्थान गाठले आहे.

## चाहत्याचे 'विराट'प्रेम

**चेन्नई :** सध्या बांगलादेश संघ भारत दौऱ्यावर आहे. दुसऱ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी घडलेला एक अनोखा किस्सा समोर येत आहे. यावेळी एका १५ वर्षीय शाळकरी मुलाने भारत विरुद्ध बांगलादेश कसोटी सामन्यादरम्यान विराट कोहलीला पाहण्यासाठी तब्बल ७ तासांचा सायकल प्रवास केला आहे. कार्तिकेय नावाच्या या मुलाने विराट कोहलीचा खेळ अनुभवायला ५८ किलोमीटर अंतर सायकलने पार केले. १५ वर्षीय मुलाचे हे 'विराट' प्रेम पाहून सर्वच अचंबित झाले आहेत.

# आयपीएलचा मेगा लिलाव रोमांचक होणार

### फ्रँचायझी ६ खेळाडूंना रिटेन करू शकणार; इम्पॅक्ट प्लेअरला प्रतिसामना फी मिळणार

**। बेंगळूरू । वृत्तसंस्था ।**

इंडियन प्रीमियर लीग २०२५ स्पर्धेबाबत क्रिकेट चाहत्यांमध्ये उत्सुकता आहे. यामागे मोठे कारण म्हणजे मेगा लिलाव आहे. हा मेगा लिलाव पूर्वीपेक्षा अधिक रोमांचक होणार आहे. या हंगामापूर्वी मेगा ऑक्शन होणार असल्याने प्रत्येक संघात मोठे बदल दिसण्याची शक्यता आहे. प्रत्येक फ्रँचायझीने सपोर्ट स्टाफमध्ये बदल करून त्यादृष्टीने पावलेही उचलले आहेत. याबाबत आयपीएल गव्हर्निंग कौन्सिलची महत्त्वाची बैठक शनिवारी (दि.२८) बेंगळूरू येथे पार पडली. या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. यामध्ये खेळाडूंचे रिटेंशन आणि राईट टू मॅच कार्ड अशा काही नियमांचा समावेश आहे. तसेच, पुढील मोसमासाठीचा मेगा लिलावात खेळाडूंची कमाई देखील वाढणार आहे.







राईट टू मॅच कार्ड हा पर्याय यापूर्वी २०१८ आयपीएल हंगामाच्या लिलावात वापरण्यात आला होता. या पर्यायामुळे संघांना लिलावादरम्यान आपल्या संघात आदल्या हंगामात असलेल्या खेळाडूला पुन्हा संघात घेता येते. पण त्यांना लिलावात त्या खेळाडूला जितक्या रुपयांची बोली लागली आहे, त्याच किंमतीत त्याला संघात परत घ्यावे लागते. मिळालेल्या वृत्तानुसार, आयपीएलच्या बैठकीत फ्रँचायझींना ५ खेळाडूंना संघात कायम करता येऊ शकते. तसेच, यंदाच्या लिलावात एक राईट टू मॅच कार्डही वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे.

तसेच, भारतीय नियामक मंडळाने इंडियन प्रीमिअर लीग २०२५ ते २०२७ साठी आठ महत्त्वा नियम जाहीर केले आहेत. यामध्ये आयपीएल फ्रँचायझी एकूण ६ खेळाडूंना रिटेन करू शकतात. हे एकतर रिटेन्शनद्वारे किंवा राईट टू मॅच पर्यायाचा वापर करून असू शकतात. ६ रिटेन्शन्समध्ये जास्तीत जास्त ५ कॅप्ड खेळाडू (भारतीय आणि परदेशी) आणि जास्तीत जास्त २ अनकॅप्ड खेळाडू असू शकतात. २०२५ साठी फ्रँचायझींसाठी लिलाव पर्सची किंमत १२० कोटी ठेवण्यात आली आहे. एकूण पगाराच्या कॅपमध्ये आता लिलाव पर्स, वाढीव वेतन आणि सामना शुल्क यांचा समावेश असेल. २०२४ मध्ये एकूण वेतन कॅप (लिलाव पर्स + वाढीव कामगिरी वेतन) ११० कोटी होते, ते आता १४६ कोटी (२०२५), १५१ कोटी (२०२६) आणि १५७ कोटी (२०२७) असे असतील.

### अनेक खेळाडू करोडपती होणार

इंडियन प्रीमियर लीगच्या अनेक खेळाडू करोडपती होणार आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने आयपीएल मेगा लिलावासाठी खेळाडू कायम ठेवण्याचे नियम निश्चित केल्यामुळे हे घडणार आहे. बीसीसीआयच्या अधिकाऱ्यांनी फ्रँचायझींच्या अपेक्षेनुसार आणि मागणीनुसार राखून ठेवल्या जाणाऱ्या खेळाडूंची संख्या ४ वरून ६ पर्यंत वाढवण्याची घोषणा केली आहे. ज्यामध्ये ५ खेळाडू राखून ठेवणे आणि एक मॅचचा अधिकार समाविष्ट असेल. परंतु, ५ खेळाडू डायरेक्ट रिटेन्शनसाठी फ्रँचायझीला ७५ कोटी रुपयांची मोठी रक्कमही खर्च करावी लागणार आहेत. कारण पहिल्या तीन खेळाडूंना अनुक्रमे १८, १४ आणि ११ कोटी रुपये मोजावे लागणार आहेत. तसेच, जर फ्रँचायझींनी आणखी दोन खेळाडूंना संघात कायम केले, तर त्यांना १८ आणि १४ कोटी रुपये द्यावे लागणार आहेत.

### आयपीएलमधील ऐतिहासीक निर्णय

आयपीएलच्या इतिहासात प्रथमच मॅच फी लागू करण्यात आली आहे. प्लेइंग इलेव्हनमध्ये खेळणाऱ्या (इम्पॅक्ट प्लेअरसह) खेळाडूला ७.५ लाख प्रति सामना फी मिळणार आहे. ही त्याच्या कराराच्या रकमेव्यतिरिक्त असेल. परदेशी खेळाडूला मेगा ऑक्शनसाठी नोंदणी करावी लागेल. नोंदणी न केल्यास तो पुढील वर्षी होणाऱ्या लिलावासाठी अपात्र ठरविण्यात येणार आहे. लिलावात नोंदणी केल्यानंतर खेळाडूची निवड झाली आणि त्याने पर्व सुरू होण्यापूर्वी माघार घेतली, तर त्याला पुढील २ पर्व लीगमध्ये भाग घेण्यास आणि खेळाडूंच्या लिलावात नाव नोंदवण्यास बंदी घालण्यात येणार आहे. भारतीय खेळाडू मागील पाच कॅलेंडर वर्षांत आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळला नसेल तर तो कॅप्ड भारतीय खेळाडू अनकॅप्ड होईल. हे फक्त भारतीय खेळाडूंसाठी लागू असणार आहे.



# तिसऱ्या दिवशीदेखील पावसाचा व्यत्यय

**। कानपूर । वृत्तसंस्था ।**

भारत आणि बांगलादेश संघात होत असलेल्या दुसऱ्या सामन्यात पावसामुळे मोठा अडथळा आला आहे. शुक्रवारपासून कानपूरमधील ग्रीन पार्क स्टेडियमवर हा सामना होत आहे. या सामन्यात पहिल्या दिवसापासून पावसाचा अडथळा आला आहे. आता पहिल्या दोन दिवशी जोरदार पाऊस झाल्यानंतर तिसऱ्या दिवशी मैदान ओले होते. यामुळे तिसऱ्या दिवशी मैदान खेळण्यासाठी योग्यप्रकारे न सुकल्याने या दिवसाचा खेळही रद्द करण्यात आला आहे. या सामन्यात आत्तापर्यंत केवळ ३५ षटकांचाच खेळ होऊ शकला आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशीही मोठ्या प्रमाणात पाऊस झाला होता. यामुळे पावसामुळे दुसऱ्या दिवशीही एकाही चेंडूचा खेळ होऊ शकला नव्हता.

याआधी पहिल्या दिवशी पावसामुळे नाणेफेक कीलाही उशीर झाला होता. उशीराने झालेली नाणेफेक भारताचा कर्णधार रोहित शर्माने जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता.

# भारताचा टी-२० संघ जाहीर

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

बांगालदेश संघ सध्या भारत दौऱ्यावर आहे. या दौऱ्यात बांगलादेश संघ भाराताविरुद्ध कसोट मालिका खेळत आहे. या मालिकेनंतर आता भारत आणि बांगलादेश संघात ६ ऑक्टोबरपासून तीन सामन्यांची टी-२० मालिका खेळली जाणार आहे. या मालिकेसाठी भारतीय संघाची शनिवारी (दि.२८) घोषणा करण्यात आली आहे. भारतीय टी-२० संघाचे नेतृत्व सूर्यकुमार यादव करणार आहे. तसेच, या संघात हार्दिक पांड्याचाही समावेश आहे. याशिवाय काही नव्या चेहऱ्यांनाही संधी देण्यात आली आहे. यात मयंक यादवला संधी देण्यात आली आहे.

याबरोबरच अभिषेक शर्मा, हर्षित राणा, नितीश कुमार रेड्डी, जितेश शर्मा, रियान पराग या युवा खेळाडूंनाही भारताच्या संघात संधी देण्यात आली आहे. त्याचबरोबर रिंकू सिंग, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, संजू सॅमसन, शिवम दुबे असे आंतरराष्ट्रीय क्रिकेटचा अनुभव असणाऱ्या खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे. यष्टीरक्षक म्हणून संजू सॅमसनबरोबर जितेश शर्मा हा विदर्भाकडून खेळणाऱ्या खेळाडूचाही पर्याय असणार आहे. दरम्यान, शुभमन गिल, यशस्वी जैस्वाल, मोहम्मद सिराज, जसप्रीत बुमराह अशा खेळाडूंना विश्रांती देण्यात आली आहे. याचबरोबर इराणी कप खेळत असल्याने ऋतुराज गायकवाड आणि इशान किशनचा विचार करण्यात आला नसण्याची शक्यता दाट आहे. ऋतुराज इराणी कप स्पर्धे साठी शेष भारतीय संघाचा कर्णधार आहे.




भारत विरुद्ध बांगलादेश टी-२० मालिकेतील पहिला सामना ६ ऑक्टोबर रोजी ग्वाल्हेर, दुसरा सामना ९ ऑक्टोबर रोजी दिल्ली तर, तिसरा सामना १२ ऑक्टोबर रोजी हैदराबाद येथे होणार असून सर्व सामने संध्याकाळी ७ वाजता सुरू होणार आहेत.

# बलाढ्य किवी संघ लंकेसमोर धाराशाही

**। कोलंबो । वृत्तसंस्था ।**

श्रीलंका क्रिकेट संघाने मोठा उलटफेर केला आहे. बलाढ्य न्यूझीलंड संघाला कसोटी मालिकेच्या दुसऱ्या सामन्यात रविवारी (दि.२९) एक डाव आणि १५४ धावांनी पराभूत केले आहे. यासह श्रीलंकेने दोन सामन्यांची कसोटी मालिका २-० अशा फरकाने जिंकत न्यूझीलंडला व्हाईटवॉश दिला आहे. श्रीलंकेच्या या विजयात गोलंदाज प्रभात जयसूर्या आणि निशान पेरिस यांनी मोलाचे योगदान दिले. दोघांनी या सामन्यात प्रत्येकी ९ बळी घेतले आहेत.



दुसऱ्या कसोटीत श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. यानंतर श्रीलंकेने हा निर्णय योग्य ठरवत अफलातून फलंदाजी केली होती. श्रीलंकेने पहिला डाव १६३.४ षटकांत ५ बाद ६०२ धावांचा डोंगर उभारल्यानंतर घोषित केला होता.

यानंतर फलंदाजीला उतरलेल्या न्यूझीलंडला श्रीलंकन गोलंदाजांनी चांगलाच संघर्ष करायला लावला. प्रभात जयसूर्या आणि निशान पेरिस यांच्यासमोर न्यूझीलंड फलंदाज फार काळ टिकू शकले नाहीत. न्यूझीलंडचा पहिला डाव ३९.५ षटकात अवघ्या ८८ धावांवर संपुष्टात आला. यामुळे श्रीलंकेला तब्बल ५१४ धावांची आघाडी मिळाली. न्यूझीलंडकडून पहिल्या डावात सर्वाधिक धावा मिचेल सँटैनरने सर्वाधिक २९ धावांची खेळी केली. तसेच, रचिन रविंद्रने १० धावा आणि डॅरिल मिचेलने १३ धावा केल्या. याशिवाय कोणालाही १० धावांचा टप्पाही ओलांडता आला नाही. श्रीलंकेकडून प्रभात जयसूर्याने सर्वाधिक ६ बळी घेतले, तर पेरिसने ३ बळी घेतले. तसेच, असिथा फर्नांडोने बळी घेतला.

श्रीलंकने मोठी आघाडी मिळवल्याने न्यूझीलंडला फॉलोऑन देण्यात आले. यामुळे न्यूझीलंडला लगेचच फलंदाजीला उतरावे लागले. न्यूझीलंडने पहिल्या डावाच्या तुलनेत दुसऱ्या डावात चांगली फलंदाजी केली. परंतु, त्यांना पराभवाला सामोरे जावे लागले.

# अल्ट्रा सायकलिंग शर्यतीचा थरार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतातील प्रतिष्ठित इंडियन ऑइल अल्ट्रा सायकलिंग शर्यतीची दुसरी आवृत्ती १० ऑक्टोबरपासून सुरू होणार आहे. तब्बल ३,७५८ किमीचे अंतर असलेली ही शर्यत श्रीनगर, जम्मू आणि काश्मीर येथे सुरू होऊन कन्याकुमारीत पूर्ण होणार आहे. ही शर्यत १२ राज्यांमधून प्रवास करताना विविध लँडस्केप, हवामान आणि भूप्रदेशाचा सामना करत पुढे जाणार आहे. या शर्यतीला वर्ल्ड अल्ट्रासायकलिंग असोसिएशनकडून मान्यता मिळाली असून रेस क्रॉस अमेरिकेचा क्वालिफायर इव्हेंट म्हणून काम करत आहे.

WORLD ULTRA CYCLING ASSOCIATION

बर्फाच्छादित हिमालयाच्या मध्यभागी सुरू होणारा अल्ट्रा सायकलिंगचा मार्ग हा राष्ट्रीय महामार्ग ४४, भारतातील सर्वात लांब महामार्ग, उत्तरेकडील पर्वतांपासून तमिळनाडूच्या किनारपट्टीच्या भूमीपर्यंत, पंजाब, मध्य प्रदेश आणि महाराष्ट्र यांसारख्या महत्त्वाच्या भारतीय राज्यांमधून जाणार आहे. हिमालयाच्या थंडीपासून ते दख्खनच्या पठाराच्या उष्णतेपर्यंत आणि दक्षिणेकडील दमट किनारपट्टीच्या प्रदेशात रायडर्सना हवामानातील बदलाशी जुळवून घेत आगेकूच करावी लागणार आहे. या शर्यतीमधील सहभागींना यमुना, नर्मदा, गोदावरी आणि कृष्णा यांसारख्या प्रमुख नद्या ओलांडताना हिमालय, आरवली, विंध्य आणि सातपुडासह महत्त्वाच्या पर्वतराजींमधून १८ हजार २०१ मीटर उंचीवरून सायकल शर्यतीचा अनोखा अनुभव अनुभवता येणार आहे.

# यानिस सिन्नरविरोधात अपिल

**। बीजिंग । वृत्तसंस्था ।**

### ■ दोन वर्षाच्या बंदीची मागणी

जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेला आणि सध्या फॉर्मात असलेला; परंतु उत्तेजक चाचणीत दोषी सापडलेल्या टेनिसपटू यानिस सिन्नरविरोधात जागतिक उत्तेजक प्रतिबंधक समितीने (वाडा) क्रीडा लवादाकडे अपिल केले आहे. वाडा आणि टेनिस उत्तेजकविरोधी नियमानुसार सिन्नरने या काळात मिळवलेली बक्षिसाची रक्कम, रँकिंग पॉइंट्स रद्द होऊ शकतात, असे आंतरराष्ट्रीय टेनिस इंटिग्रिटी एजन्सीचे म्हणणे आहे. सिन्नरवर एक किंवा दोन वर्षांची बंदी घालण्याची मागणी वाडाने केली आहे. वाडाचे हे अपिल मान्य झाले तर बंदी सिन्नर उत्तेजक चाचणीत




दोषी सापडला तेव्हापासूनची नसेल. यामुळे आतापर्यंत मिळवलेले ग्रँड स्लॅम विजेतीपदे त्याच्याकडे कायम राहतील. एकीकडे वाडा सिन्नरच्या विरोधात अपिल करत आहे आणि तो बीजिंग येथे सुरू असलेल्या चायना ओपन स्पर्धेत खेळत आहे.



हनुमान उपासक प्रख्यात ज्योतिषाचार्य...
**पंडितजी शिवाजी शास्त्री नवरात्रीनिमित्त अलिबागमध्ये**

हरिद्वार, नाशिक, त्र्यंबकेश्वर येथून जनतेच्या आग्रहामुळे अलिबाग येथे आलेले आहेत.



**दुवा भी तकदीर बदल देती है । कोशिश हर बंद दरवाजा खोल देती है।**
**सोमवार दि. ३०-९-२०२४ ते रविवार दि. ६-१०-२०२४ पर्यंत संपर्क साधा...**

पंडितजी स्त्री पुरुषांना कोणत्याही समस्यांवर ज्योतिष शास्त्र आणि वास्तू शास्त्राच्या आधारे मार्गदर्शन व निवारण करतात. आपला चेहरा, हस्त रेखा, जन्म कुंडली, जन्म तारीख किंवा फोटो निरीक्षण करुन भविष्य सांगतात. आपली नोकरी, व्यापार, उद्योगधंदा, कोर्ट, कचेरी, कुटूंबातील कलह, संतान सुख, नोकरी, प्रेम विवाह, शारीरीक दोष निवारण, कालसर्प दोष, ग्रहांची बाधा निवारण किंवा आपली उन्नती कोणत्याही दोषामुळे होत नाही. यावर उपाय सांगतात. नारायण नागबळी विषयी मार्गदर्शन, शनी, मंगळ गुरु या ग्रहांची पीडा, रुद्र अभिषेक, नवचंडी पाठ, मृत्युंजय जप, सप्तपदी पाठ, शनि अभिषेक, राजनिती अशा अनेक कठीण समस्येवर उपाय करुन मानसिक व शारिरीक कष्ट दूर करतात. स्त्री पुरुष दो, स्थावर मालमत्ता, प्रॉपर्टी संदर्भात योग्य मार्गदर्शन, अभ्यासात मन न लागणे, शत्रु परेशानी, मुलामुलीचे विवाह होत नाहीत. संबंध तुटतात, कुलदेवताचा दोष, मकान, आदी यावर उपाय सांगतात. कोणतेही प्रश्न शास्त्राच्या आधारावर सांगतात.

**सूचना-** शनि रक्षा कवच, नजर सुरक्षा कवच, नवग्रह राशीचे खडे, प्राणप्रतिष्ठा सर्व प्रकारची विधी हनुमान दादाच्या कृपेने सिद्धी करुन मिळेल. संतान सुखासाठी पती पत्नी दोघांनी भेटावे. व्यसनमुक्तीवर मार्गदर्शन मिळेल. सर्व पुजा पाठ शास्त्रीय पद्धतीने केल्या जातील. ज्यांची जन्म कुंडली असेल त्यांची अवश्य घेऊन येणे.

**पत्ता-** हॉटेल गुरुजी, रुम नं. १०४, अलिबाग बिच, ता. अलिबाग, जि. रायगड

**आपले प्रश्न आपल्यापर्यंत असतील, पंडितजी केवळ ३ प्रश्नांचेच उत्तर देतील.**
भेटण्या अगोदर आपली वेळ फोनवर निश्चित करा.
**Contact : 8766507585**

**भेटण्याची वेळ** सकाळी ९.०० ते सायं. ६.००
**भविष्य पाहण्याची फी** रु. १०१ /- मात्र

### खोपोलीच्या विद्यार्थ्यांच्या खेळ कौशल्याचे प्रदर्शन

# जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

क्रीडा व युवक सेवासंचलनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालय रायगड-अलिबाग आयोजित जिल्हास्तरीय बास्केटबॉल स्पर्धेचे आयोजन खोपोलीतील कारमेल कॉन्व्हेन्ट स्कूल येथे शासनाच्यावतीने करण्यात आले होते. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील ३० संघांनी विविध वयो गटात सहभाग होऊन आपल्या सांघिक खेळ कौशल्याचे प्रदर्शन केले.

पोलीस निरीक्षक शीतल राऊत या स्वतः विद्यपीठ तथा राष्ट्रीय बास्केटबॉल खेळाडू असून त्यांनी विविध स्तारावर या खेळात नैपुण्य प्राप्त केले आहे. यावेळी त्यांनी खेळातील बारकावे समजावून सांगताना सराव आणि सातत्य हेच यशाचे गमक आहे. खेळाडूने प्रत्यक्ष मैदानावर जाऊन किमान दोन तास खेळायला हवे. मोबाईल पासून दूर राहत खेळ आणि अभ्यासाचा योग्य सामन्वय साधला पाहिजे, याबाबत बहुमूल्य मार्गदर्शन केले. स्पर्धेच्या उद्घाटन समारंभावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्यासह जिल्हा क्रीडाधिकारी कार्यालयाचे राज्य क्रीडा मार्गदर्शक संदीप वांजळे, मुख्याध्यापिका सिस्टर निर्मल मारिया, तालुका कुस्तीगीर संघाचे सदस्य गुरुनाथ साठेलकर, तालुका क्रीडा समन्वयक जगदीश मरागजे, सिस्टर आयविन, सत्येंद्र यादव, जयश्री नेमाने, समीर शिंदे, धनश्री गौडा, अमित थिटे, प्रणय गायकर आदी मान्यवर उपस्थित होते.



ही बास्केटबॉल स्पर्धा १४, १७ व १९ वर्ष मुले व मुली अश्या गटात खेळवल्या गेल्या. यावेळी कारमेल स्कूल खोपोलीच्या चारही संघांनी अंतिम फेरी गाठून विजय संपादन केला. विजेत्या संघाची मुंबई विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली असून, सर्व विजेत्यांचे व प्रशिक्षकांचे कारमेलच्या लोकल मॅनेजर सिस्टर मरिना यांनी कौतुक केले आहे.

### स्पर्धेचा अंतिम निकाल

**१४ वर्ष मुली :-**
विजेता: कारमेल स्कूल, खोपोली
उपविजेता: दिल्ली पब्लिक स्कूल,पनवेल

**१४ वर्ष मुले :-**
विजेता: कारमेल स्कूल, खोपोली
उपविजेता: एल.के.एम. स्कूल, उरण

**१७ वर्ष मुली :-**
विजेता: कारमेल स्कूल, खोपोली
उपविजेता: एल.के.एम. स्कूल, उरण

**१७ वर्ष मुली :-**
विजेता: कारमेल कॉन्व्हेंट स्कूल, खोपोली
उपविजेता: एल.के.एम स्कूल, उरण

**१७ वर्ष मुले :-**
विजेता: दिल्ली पब्लिक स्कूल, पनवेल
उपविजेता: कारमेल स्कूल, खोपोली

**१९ वर्ष मुली :-**
विजेता: दिल्ली पब्लिक ज्यु. कॉलेज, पनवेल
उपविजेता: जनता ज्युनियर कॉलेज, खोपोली

**१९ वर्ष मुले :-**
विजेता: एल.के.एम ज्युनिअर कॉलेज, उरण
उपविजेता: व्ही.डी.एम ज्यु. कॉलेज, खोपोली

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)